विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०२० |
| वर्ष | : | पंचावन्नावे |
| अंक | : | पहिला आणि दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०२०**

**गणपत्रिका क्रमांक : २०३**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : पंचावन्नावे अंक : पहिला चैत्र/वैशाख १९४२ एप्रिल २०२०
अंक : दुसरा आषाढ/श्रावण १९४२ जुलै २०२०

## *संपादकीय*

### जनार्दन एकनाथ - खांब दिला भागवत

फाल्गुन वद्य षष्ठी ही 'नाथषष्ठी' म्हणून महाराष्ट्रात साजरी केली जाते. नाथषष्ठी दि. १४ मार्च रोजी होती. संत एकनाथ हे वारकरी परंपरेच्या प्रभावळीतील तेजस्वी संत. महाराष्ट्राची दक्षिणकाशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या पैठण गावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या घराण्यात पांडुरंगाची भक्ती अनेक पिढ्यांपासून होती. संत भानुदासांचे ते पणतु. वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे नाव रुक्मिणी. बालपणीच आईवडील निवर्तल्यामुळे एकनाथांचे संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी केले. वयाच्या बाराव्या वर्षी एकनाथांनी देवगिरी येथील जनार्दनस्वामींकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व पत्करले. तेथे सहा वर्षे राहून संस्कृत शास्त्रपुराणांचे व ज्ञानेश्वरीसारख्या अध्यात्मग्रंथाचे अध्ययन त्यांनी केले. एकनाथांच्या एकूणच वाङ्मयावर ज्ञानेश्वरीचा प्रभाव जाणवतो. एकनाथांनी गुरुजनार्दनस्वामी सोबत काहीकाळ तीर्थयात्रा केली असा उल्लेख आहे. नंतर त्यांनी गृहस्थधर्म स्वीकारला. गिरीजा हे त्यांच्या पत्नीचे नाव. त्यांना हरिपंडित नावाचा मुलगा होता.

एकनाथांचे पणजोबा भानुदासांनी विजयनगरच्या राजा कृष्णराय याने पंढरपूरची श्रीविठ्ठलाची मूर्ती त्याच्या राजधानीतून परत आणली अशी एक आख्यायिका आहे. एकनाथांनी विपुल ग्रंथरचना केली.

संत बहिणाबाईंनी वारकरी संतपरंपरेत एकनाथांना खांबाची उपमा दिली आहे.

जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।।

अस्पृश्याच्या चुकलेल्या मुलास कडेवर घेऊन महारवाड्यात पोहोचवणे, श्राद्धाला ब्राह्मण येईनात, तेव्हा शिजवलेले अन्न अस्पृश्यांना खाऊ घालणे व गाढवाला गंगोदक पाजणे यासारख्या एकनाथांच्या

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

३) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

४) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्रीमती रेखा प्रकाश दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९९२०७९४७६९/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), काभे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| ''अर्धनारी नटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरुप वर्णन'' | ८ |
| सनातन धर्म, वर्ण व जाती जगभरच्या अखिल मानवजातीला लागू आहेत | १४ |
| श्रीमद्भागवत सप्ताह परंपरा - प्रस्तावना | १६ |
| परमार्थ | २० |
| बाधति बाधते..... | २४ |
| विवेकानन्द शिला स्मारक, कन्याकुमारी | २६ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

१) सुलभ संध्या व पूजा — रु. ५
२) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि — रु. ५
३) हरितालिका पूजा विधि — रु. १०
४) श्री सत्यनारायण पूजा व कथा — रु. १५
५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) — रु. १०
६) तुलसी विवाहविधि — रु. १०
७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) — रु.२५
८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक रु.१५ (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.)
९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) रु.३०
१०) उपासना — रु. ४०
११) श्रीरामरक्षेतील व्याकरण — रु. ५०
१२) चांगदेव पासष्टी — रु. ४०
१३) गंगालहरी — रु. २५
१४) गणपत्यथर्वशीर्षांतील व्याकरण — रु. ३०
१५) सांख्यदर्शन — रु. ३०
१६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) — रु. १५


- या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
- मनीऑर्डरने पैसे पाठविताना मनीऑर्डर फॉर्मवर आपला मोबाईल क्रमांक लिहावा म्हणजे संपर्क करणे सोपे पडते.
- सद्धर्माच्या लेखकांनी त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा. **- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील व दी.का. देणगीदारांची नावे अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येतील. **- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ४२ वा

**कुपुत्रेण सर्वं कुलं नश्यति।** [४३४]

कुपुत्रामुळे सर्व कुळाचा नाश होतो.

**एकेन शुष्कवृक्षेण दह्यमानेन वह्निना**
**दह्यते तद्वनं सर्वं कुपुत्रेण कुलं यथा।।**
**पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति।**[४३५]

पुरुषार्थाशिवाय दैव फळाला येत नाही.

**यथा एकेन चक्रेण रथस्य गतिर्न भवेत्**
**एवं पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति।।**
**कष्टः खलु पराश्रयः।**[४३६]

दुसऱ्याच्या आश्रयाला राहणे कष्टकारक असते.

**शिरसा धार्यमाणोऽपि सोमः सौम्येन शंभुना**
**तथापि कृशतां धत्ते कष्टः खलु पराश्रयः।।**

चन्द्राला शंकराने डोक्यावर धारण केले आहे तरी त्याला दर महिन्यात कृशता सोसावीच लागते.

**कारणेन हि जायन्ते मित्राणि रिपवस्तथा।**[४३७]

कारणामुळेच मैत्री अथवा शतृत्व येते.

**न कश्चित् कस्यचिन्मित्रं, न कश्चित् कस्यचिद्रिपुः।**
**कारणेन हि जायन्ते मित्राणि रिपवस्तथा।**
**गुरुणां सन्निधौ तिष्ठेत् सदैव विनयान्वितः**[४३८]

मोठ्यांच्या सान्निध्यात सदैव नम्रपणे असावे.

**पादप्रसणादिनि तत्र नैव समाचरेत्**

त्यांच्या समोर पाय पसरुन बसणे, जांभया देणे असे प्रकार करू नयेत.

**कण्ठचामीकर न्यायः**[४३९] – कण्ठचामीकर म्हणजे गळ्यातला सोन्याचा दागिना. कामाच्या धांदलीत एकदा काकूंची नथ पडली. खूप शोध केला पण ती सापडली नाही. काकूंचा हात सहज गळ्यातल्या दागिन्याकडे गेला. नथ त्या दागिन्यात अडकून पडली होती. नथ मिळाली. काकू म्हणाल्या, ‘काखेत कळसा अन् गावाला वळसा.’

**स्थूणानिखनन न्यायः**[४४०] – खुंटा घट्ट बसविण्यासाठी पडलेली म्हण ‘हलवून खुंटा घट्ट करणे’.

**भिक्षुपादप्रसारण न्यायः**[४४१] – ‘भटाला दिली ओसरी भट हळू हळू पाय पसरी’.

**नृपनापितपुत्र न्यायः**[४४२] – राजा न्हाव्याला गावातील सुंदर मूल घेऊन ये म्हणून सांगतो. न्हावी आपलेच मूल हजर करतो. ‘आपला तो बाब्या लोकाचं ते कार्टं.’

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड – ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाईल : ९६३७२४८१४७

## कालभैरवाष्टकम् ।

दि. दा. औटी

**धर्मसेतूपालकं त्वधर्ममार्गनाशनम्**
**कर्मपाशमोचकं सुशर्मधायकं विभुम्।**

**स्वर्णवर्णशेषपाशशोभितांगमण्डलम्**
**काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।५।।**

**१) धर्मसेतूपालकं**

धर्मस्य सेतुः ष.त.।
पालनं करोति इति पालकः उप. त.।

धर्म सेतोः पालकः धर्मसेतु पालकः ष. त. तम्।

धर्मरुपी सेतूचे पालन करणाऱ्या.

**२) अधर्ममार्गनाशनम्:**

न धर्मः अधर्मः नञ त.।
अधर्मस्य मार्गः अधर्म-मार्गः ष. त.।
अधर्ममार्गस्य नाशनः अधर्ममार्गनााशनः ष. त.।

तम्-धर्म बाह्य मार्गाचा नाश करणाऱ्या.

**३) कर्मपाशमोचकं**

कर्मणः पाशः कर्मपाशः ष. त.।
मोचनं करोति इति मोचकः। उप. त.।
कर्मपाशानां मोचकः कर्मपाशमोचकः तम् ष.त.।

कर्मरूपी पाशातून सुटका करविणाऱ्या.

**४) सुशर्मधायकं**

शोभनं शर्म सुशर्म क. धा.।
सुशर्मणः धायकः सुशर्मधायकः ष.त.।

चांगले सुख प्राप्त करवून देणाऱ्या.

**५) विभुम्** - परमेश्वराला

**६) स्वर्णवर्णशेषपाशशोभिताङ्गमण्डलं**

स्वर्णस्य वर्णः स्वर्णवर्णः ष.त.।
शेषस्य पाशः शेषपाशः ष.त.।
स्वर्णवर्णस्य, शेषपाशस्य च श्‍व शोभितम् अङ्गमण्डलं यस्य सः स्वर्णवर्ण.... मण्डलः बहुव्रीहि तम्।

सोन्याप्रमाणे आणि शेषाच्या सौंदर्याप्रमाणे ज्याच्या शरीराचे सौंदर्य आहे अशा त्या काशीविश्वेराला काळभैरवाला मी भजतो.

टीप : १ ते ६ सर्व सामासिक शब्दांची योजलेली कालभैरवाची विशेषणे द्वितीया विभक्तीत आहेत.

क्रमशः

दि. दा. औटी

●●●

# एक भावपूर्ण श्रद्धांजली



**श्रीयुत प्रकाश भा. दीक्षित**

(१६/०८/१९४४ – ०६/०५/२०२०)

श्रीयुत प्रकाश भा. दीक्षित ऊर्फ 'अण्णा' हे दीक्षित परिवारातील एक ज्येष्ठ. तसेच आपले वडील निवर्तल्यानंतर आपल्यावरील जबाबदाऱ्या अत्यंत खंबीरपणे पार पाडणारे एक कुशल व्यक्तिमत्त्व. नुकतीच त्यांची पंचाहत्तरी दोन्ही मुलांनी साजरी केली तेव्हा हा शेवटचा समारंभ आहे हे ज्ञातही नव्हते.

त्यांच्या सतत Positive Thinking डॅशींग निर्णय घेण्याची क्षमता, सुहास्य मुद्रेने हसत–खेळत जमवलेला असंख्य मित्रपरिवार, जबरदस्त ईच्छाशक्ती व सगळ्यांनाच मदत करण्याचा स्वभाव, हे सर्वांच्या लक्षात राहण्यासारखे गुण विशेष.

श्री. प्रकाश दीक्षितांचा 'सद्धर्म' त्रैमासिकाशी २० वर्षाहून अधिक संबंध होता. सुरुवातीला जेव्हा ते कळव्यात रहायचे तेव्हा ते एका कार्यकर्त्याच्या भावनेने जरूरी कामे करायचे. ठाण्यात रहायला आल्यावर गेली १५–१६ वर्ष त्यांनी अखेरपर्यंत विश्वस्त म्हणून काम केलं. या कारकीर्दीत त्यांनी सद्धर्मची संपूर्ण कार्यप्रणाली संगणाभिमुख केली. सभासदांचे पत्ते, टेलिफोन / मोबाईल क्रमांक, सभासद क्रमांक इत्यादी सर्व माहिती तपासून संगणकावर उपलब्ध केली. त्रैमासिकाचं वितरण करताना पत्त्याचे स्टिकर्स संगणकाद्वारे छापून घेऊन पाकिटांवर सहज चिकटवता येतील अशी व्यवस्था केली. यामध्ये त्यांना श्री. मोहनराव पालये हे आपली नोकरी सांभाळून मदत करीत असत. सभासद वर्गणी नेटबँकिंग तर्फे खात्यात जमा करायची व्यवस्था ही सुरू केली पण जिथे ही सुविधा उपलब्ध नाही तिथे मनी ऑर्डरनी वर्गणी स्विकारण्याची प्रथाही कायम ठेवली होती.

लक्ष्मी–केशव कार्यालय जेव्हा सद्धर्मसाठी उपलब्ध होईनासे झाले तेव्हा त्यांनी ते आपल्या घरी हलवलं व जुने सर्व अंक जिथे नव्हते तिथे वाचकांकडून मागवून, त्याची कॉपी करून, व्यवस्थित रेकॉर्ड रचले. या कार्यात त्यांच्या पत्नीचाही पुढाकार होता.

सद्धर्मला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सहयोग मंदिरात संस्कृतच्या व्यासंगी अधिकारी सौ. धनश्री लेलेंचे ४ दिवस कालिदासाच्या 'मेघदूत' या विषयावर व्याख्यानाचं आयोजन केलं होतं. यामध्ये त्यांचा मोठा वाटा होता. ऑक्टोबर २०१५ साली त्यांनी सर्व वाचकांना दिवाळी भेट म्हणून लक्ष्मी पूजनाची हस्तलिखित पोथी व अष्टविनायक प्रतिमांकित मयूरदीप चित्राची भेट दिली होती. पोथी व चित्राची संकल्पना व निर्मिती सद्धर्मचे नियमित लेखक आचार्य वसंतराव गोडबोले यांची होती.

सुमारे १९९५-१९९६ चे दरम्यान 'सद्धर्म' चे कार्यालय मुंबईतील खत्री चाळीतून ठाणे येथे आणल्यापासून कै. धोरे काका (मृत्यू - २०१४) आणि श्री. दीक्षित हेच 'सद्धर्म'चे प्रकाशन करण्यात पुढे होते. अशा या कार्यकर्त्याला आपण मुकलो आहोत. संपूर्ण 'सद्धर्म' परिवारातर्फे मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो.

पतंजली योगसूत्र पुस्तकाचे पुर्नमुद्रण करायचे त्यांच्या मनात होते व त्यांनी त्यादृष्टीने प्रयत्नही सुरू केले होते. त्यांच्या या कार्यात त्यांच्या पत्नीचीही त्यांना शक्यतोपरी मदत होत होती.

अशा ह्या 'अण्णांना' कुठल्याही औषधोपचारांना प्रतिसाद न दिल्याने दिवसेंदिवस ढासळत जाणारी प्रकृती व 'कोरोना लॉकडाऊन'मुळे सर्व ऋणानुबंध सोडून, मित्रपरिवाराविना अनंतात विलीन व्हावे लागले, याचीच एकमेव खंत वाटते.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो हीच प्रार्थना.

**अुत्तम जोशी**
विश्वस्त

## निवेदन

मार्च २०२० मध्ये एप्रिलच्या अंकाची पूर्ण तयारी झाली होती आणि करोनाच्या संकटामुळे छापखाना बंद झाला आणि तो अंक छापू शकलो नाही. याबद्दल क्षमस्व.

त्यानंतर १५ एप्रिल पासूनच श्री. प्रकाश दीक्षित यांना थोडा-थोडा त्रास सुरू झाला आणि अचानक त्यांना हॉस्पिटलमध्ये हलवावे लागले. दि. ६ मे रोजी त्यांचे दुःखद निधन झाले.

सद्य परिस्थितीमध्ये एप्रिल आणि जुलैचा जोड अंक म्हणून प्रकाशित करत आहोत.

**डॉ. विजय बेडेकर**
संपादक आणि मुख्य विश्वस्त

## ''अर्धनारी नटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरुप वर्णन''

**वसंत गोडबोले**

(लेखाचा उर्वरित भाग मागील अंकापासून पुढे ...)

मूर्तीस्वरुप कोणतेही असो, भावना महत्वाची असते. यासंबंधी एक श्लोक असा आहे.

''न देवो विद्यते काष्टे न पाषाणे न मृण्मये।
भावे हि विद्यते देवो तस्मात् भावो हि कारणम्।।''

अव्यक्ताची उपासना फार कष्टदायी आहे. श्रीमद्भगवद्गीतेत श्लोक असा आहे यासंबंधी

''क्लेशो ऽ धिकतरस्तेषामव्यक्ता सक्तचेतमाम।
अव्यक्त हि गतिर्दुःखं देहवभ्दिरवाप्यते।।''

म्हणजे अव्यक्तात चित्त एकाग्र करण्याची इच्छा असणाऱ्याला अत्यंत कष्ट होतात. कारण देहेन्द्रिय धारण करणाऱ्या मनुष्याला अव्यक्ताची गति प्राप्त करणे हे स्वभावतःच अत्यंत कष्टदायी आहे.

साधनेमध्ये मूर्तीमध्ये दीर्घ काळ मन स्थिर करण्याची साधना हा मनुष्याचा प्रयत्न व त्यानंतर एकाएकी मूर्तीचा लय होणे व पूर्णतेची अनुभूती येणे ही ईश्वरकृपा व या दोन्हीचे एकत्र होणे वा मिलन जेव्हा साधले जाते तेच मनुष्याचे जीवनाचे परमोच्च अवस्थेचे दर्शन होय. मनुष्याला उद्धरण्याची शक्ति निर्जीव मूर्तीत नाही तर त्यामागच्या भावनेत आहे. परब्रह्म या आकारात/ मूर्तीप्रकारात आहे ही भावनाच मूल्यवान, म्हणून मूर्तीची जेव्हा प्रतिष्ठा 'प्राणप्रतिष्ठा' करतात त्या क्षणी ती प्रतिमा मूर्ती न रहाता प्रत्यक्ष परमेश्वर, परब्रह्म बनते. हे या निमित्ताने लिहिणे योग्य वाटते व ते सर्व देवदेवतांचे मूर्ती पूजनास लागू आहे.

शिवमूर्तीमध्ये महत्वाची जी प्रतीके असतात त्या संबंधीचे वर्णन प्रतीकनिहाय असे आहे.

१) त्रिशूल : हे शंकराचे आयुध/ शस्त्र समजले जाते त्याचे प्रतिकात्मक अर्थ अनेक आहेत.

अ) एक अस्त्र या अर्थाने त्या रुपात अभद्र, अमंगल वाईट गोष्टी नष्ट करण्याची क्षमता असल्याचे ते प्रतीक आहे.

ब) त्रिशूलाची तीन टोके हे सृष्टीच्या उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्थांचे प्रतिनिधित्व करतात. शैव संप्रदायी यांना शिवच या तिन्ही अवस्थांचे अधिपती समजतात.

क) हा पशुपति, पशु व पाश यांचे प्रतिनिधित्व करतो असे शिवसिद्धांत म्हणून मानतात.

ड) प्रकृतिच्या सत्त्व, रज, तम या गुणांचे हा प्रतिनिधित्व करतो.

ई) महाकालेश्वराच्या तीन काळाचे (वर्तमान, भूत व भविष्य) द्योतक आहे.

फ) स्वपिंड, ब्रह्माण्ड व शक्ती यांचे परमपदाशी असलेले एकत्व दर्शवितो.

ग) डाव्या बाजूस स्थित इडा, उजव्या बाजूस स्थित पिंगळा व मध्यभागी स्थित सुषुम्ना नाडी यांचे द्योतक आहे.

ह) ज्योतिषशास्त्रानुसार हा मंगळाशी संबंधीत आहे.

ज) सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचा संहार करणारा तो ब्रीद प्रतीक आहे.

त्रिशूल हे दाखवितो की सज्जन रक्षणासाठी शंकर सदैव जागृत आहेत. तसेच खलनिर्दालनापर्थ ते सदैव कटिबद्ध आहेत. (दुर्जनांची लबाडी ते तत्काळ ओळखतात व आपल्या भोळ्या भाबड्या भक्तांचे दुर्जनापासून रक्षण करतात. उदा. ईश्वराचे अस्तित्वच नाकारण्याचे कार्य त्यांना मान्य नाही. याचा दाखला देण्यासाठीच त्यांनी दक्ष प्रजापतिचे यज्ञाचा नाश केला आहे) शंकर भोळे नाहीत तर भोलानाथ म्हणजे भोळ्या लोकांचे रक्षक/नाथ आहेत.

२) डमरु : असे समजले जाते की नादाची उत्पत्ती भगवान शंकरांचे डमरु वाजवण्याने झाली. संगीतातले अन्य स्वर येतात जातात पण त्यामध्ये मुख केंद्रीय स्वर नाद आहे. अनुभवी मुरलेले संगीत तज्ज्ञच नादाचा आनंद घेऊ शकतात. या नादापासूनच वाणीची चार रुपे उत्पन्न झाली असे मानतात. त्या चार वाणी अ) परा ब) पश्यन्ती क)मध्यमा व ड) वैखरी. यापैकी वैखरी वाणीतून अक्षर वा वर्ण उत्पन्न होतात, जे आपण भाषारुपात बोलतो ह्याचा आधार वैखरी वाणीच आहे. पर-वाणीरुप महाबिन्दूच्या स्फोटापूर्वीची स्थिती आहे. त्यामुळे ती अगम्य व अनाकलनीय आहे. हे रुप कुंडलिनीच्या मूलाधार चक्रात अस्तित्वात असते. पश्यन्ति वाणी ही स्पंदन वाणीरुपात अस्तित्वात असते. तिची व्याप्ती/स्थान मूलाधारचक्र ते मणिपूरचक्र एवढी असते. मध्यमा वाणीचे दोन प्रकार आहेत. अ) मध्यमा शब्द ब) मध्यमा अर्थ. यापैकी मध्यमा शब्द ही मानसिक गति आहे तर मध्यमाअर्थ स्थूल वा मूर्त वस्तूची मानसिक प्रतिमा/छाप आहे. जेव्हा आपण कोणी उच्चारलेला शब्द ऐकतो तेव्हा आपल्या डोक्यात/मनात त्या शब्दाचे द्वारा त्या वस्तूचा वा अस्तित्वाचा बोध होतो. हेच असते शब्दाचे अर्थ ग्रहण. अध्यात्म साधनेत याला एक विशिष्ट तसाच पारिभाषिक अर्थ आहे. हा कुंडलीनी जागृतीशी संबंधित आहे. हा अनाहत नादाचा विषय आहे. कोणत्याही आघाताशिवाय उत्पन्न झालेले चिदानंद अखंड, अगम्य तसेच अलख रुपी सूक्ष्म ध्वनी हे अनाहत नाद असतात. या अनाहत नादाचे दिव्य संगीत ऐकण्याने गुप्त मानसिक शक्ती प्रगट होतात. या अनाहत नादावर ध्यानाची एकाग्रता करण्याने हळू हळू समाधि-अवस्थेकडे प्रगति होऊन समाधी लागू लागते. नादाच्या आधारावर साधकाने मनोलय केल्यास तो ब्रह्मरुप परमपदाशी एकात्मता मिळवू शकतो. डमरु हे या नाद-साधनेचे प्रतीक आहे. एक प्रकारे ते संगीताचे प्रतीक आहे. संस्कृतमध्ये 'संहार' याचा अर्थ

शृंगार वा सजावट असाही होतो. सर्जन व विसर्जन दोहोंच्या सहयोगानेच सृष्टीची सजावट सुंदर वाटते.

डमरू हे ज्ञानाचे उगमस्थान आहे. महर्षी पाणिनींना त्यांचे व्याकरणाचे बीजमंत्र डमरुचे आवाजातूनच सापडले होते अशी दंतकथा आहे. स्वतः भगवान शंकरांनी त्यांच्या कानाजवळ डमरु वाजवून हे ज्ञान त्यांना दिले असे म्हणतात. अशी कितीतरी रहस्ये भगवान शंकर सृष्टीतील संशोधकांचे कानाजवळ डमरु वाजवून सांगतही असतील. ईशकृपेनेच जगातील बहुतांशी शोध लागले आहेत मानवाला असे मी मानतो पण पाणिनींनी जसे प्रांजळपणे कबूल केले तशी दानत आजच्या मानवात नाही.

३) सर्प/नाग : भगवान शंकराचे एका ज्योतिर्लिंगाचे नाव नागेश्वर असे आहे त्यावरुन असे स्पष्ट होते की ते नागांचे ईश्वर आहेत म्हणूनच शंकरांचा नाग वा सर्पाशी अतूट संबंध आहे. भारतात नागपंचमीला नागपूजनाची परंपरा आहे. विद्वानांचे मते नागपूजा ही आर्येतर संस्कृतीचे प्रभाव दाखविणारी आहे. (द्रवीड संस्कृती/अनार्थ संस्कृती) परस्परविरोधी मतांमध्ये सामंजस्य घडविणारे शंकर भगवान नाग/सर्प या सारख्या क्रूर व भयानक प्राणी/जीव यास गळ्यातला हार बनवतात. हा लपेटलेला नाग/सर्प निद्रीस्त, वेटोळे घालून बसलेल्या कुंडलिनी शक्तीचे प्रतिक आहे. भगवान शंकर सर्पांना स्वशरीरावर खेळवतात. विषारी दात नसलेला नाग (ते दात पाडल्यावर) हानिकारक नाही तसे जे विष निर्विष केले जाता ते पण नुकसानकारक नाहीतच. षडरिपू काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे जाणारे विकार नाहीत पण ते उदात्त विचाराने संस्कारित केले तर कधीच बाधक/हानी करणारे रहात नाहीत. यातून असेही सिद्ध होते की ज्ञानी पुरुष कुशलतेने सापासारख्या जहरी माणसाकडूनही चांगले कार्य करून घेऊ शकतात व ही जगात जहरी म्हणून समजली जाणारी माणसे ज्ञानी महापुरुषांजवळ राहून निर्विष व कार्यसाधक बनतात. भगवान शंकर नीलकंठ या नावानेही प्रसिद्ध आहेत. शिव म्हणजे मंगल/कल्याणकारी काम करण्याची इच्छा असणाऱ्या मानवाने सतत विष/कटू घोट पचवण्याची हिंमत ठेवायला हवी. फक्त जेव्हा विष समुद्र मंथनातून निघाले तेव्हा सर्व देव दानव पळाले. रत्ने मात्र सर्वांनी धेतली. अमृतही प्याले पण विष/हलाहल निघताच सर्व पळाले. अमृत पितो तो देव व जग कल्याणाकरता विष पिणारे शंकर म्हणूनच ते महादेव. म्हणूनच ते नागेश्वर नाग/सर्प गळ्यात मिरवणारे. सर्प/नाग हे प्रतीक याचसाठी.

४) चंद्रकोर : शंकरांचे मस्तकी जी चंद्रकोर आहे ती बीजेची (गणपतीने धारण केलेली चतुर्थीची) बारा ज्योतिर्लिंगांपैकी एका ज्योतिर्लिंगाचे नाव सोमनाथ (सौराष्ट्रात आहे). असे सांगतात चंद्राने त्याला लागलेला शाप निवारणार्थ शिवोपासना शिवलिंग स्थापून केली व शापमुक्त झाला म्हणून त्या शिवलिंगास सोमनाथ म्हणजे चंद्राचा नाथ

म्हणतात व हे शिवलिंग चंद्राचे भक्तीने प्रसन्न झालेल्या शंकराचे प्रतीक आहे. चंद्र हा मनाचा कारक आहे ''चंद्रमा मनसो जाताः।'' असे म्हणतात. ज्योतिषशास्त्र दृष्टीकोनातून चंद्र सत्यगुणी आहे. ज्या माणसाचे कुंडलीत चंद्र उच्चीचा व शुभस्थानी, अशुभ ग्रह दृष्टी नसणारा असतो. (अशुभ ग्रहाचे दृष्टीत / योगात नसतो) त्या जातकाला /मानवाला सत्त्वगुणी व्यक्तित्व मिळते/ त्याच्याच सत्त्वगुण प्रगट होतात व त्याप्रमाणेच त्याचे आचारविचार रहाणीही असते. शंकरांनी चंद्र धारण करून मनावरचे नियंत्रण दाखवलेआहे. बीजेचा चंद्र हा कर्मयोग्याचे प्रतीक आहे. या चंद्रकोर धारणेने शंकरांनी दोन गोष्टी दाखविल्या आहेत.

अ) दुसऱ्यांचे गुण याप्रमाणे मस्तकी धारण करून दाखविण्याची दानत व हिंमत ही ज्ञानवंताला महान बनवते. त्याचे गुणग्राहकत्व / 'गुणी गुणं वेत्ति' ही म्हण सिद्ध करते.

ब) बीजचंद्रकोर कर्मयोगप्रतीक महणून शंकर भगवान खऱ्या कर्मयोग्यालाच मस्तकी धारण करतात. उच्च स्थानी विराजमान करतात.

५) जटाभार – भगवान शंकर जटाजूटधारी आहेत. याबद्दल पुराणात अनेक प्रकारचे स्पष्टीकरण आहे. त्यातले एक म्हणजे गंगावतरणाचे. गर्विष्ठ गंगेचा गर्व उतरविण्यासाठी त्यांनी तिला आपल्या जटाभारात अडकवून टाकले व नंतर तिची एक धार भगीरथ पूर्वज शापमुक्त करण्यासाठी व लोककल्याणासाठी पृथ्वीवर प्रवाहित केली.

शिवमूर्तींमध्ये हा जटाभार समान रुपात दाखविलेला नाही. प्रत्येक मूर्तीत तो वेगळारुपी आहे. नटराज मूर्तीत जो (तांडव नृत्यरुपी मूर्ती) हा जटाभार विखुरलेला आहे व उडणाऱ्या केसरुपात आहे तर अशा इतर मूर्तीत तो बांधलेला व मस्तकावर /डोक्यावर धारण केलेला दाखविला आहे. या दोन वेगळ्या प्रकाराचा प्रतीकार्थ काय असू शकेल? याचा विचार करता खालील अर्थ मला जसे समजले/ वाटले ते अल्पमतीने देत आहे.

शिवजटाभार ब्रह्माण्डातील वेगवेगळ्या लोकांचे प्रतीक आहे. मोकळे, विखुरलेले व उडते केस विभिन्न लोकातील परस्पर संतुलनचक्र / सामंजस्याचे विखरलेले व ते नष्ट झाल्याचे प्रतीक आहे. हे संतुलन वा लयबद्धता नष्ट होवून सृष्टी प्रलयाकडे जात असल्याचे प्रतीक आहे, तर बांधलेला जटाभारविभिन्न लोकातील संतुलन चक्राचे प्रतीक आहे. सृष्टीच्या लयाचेही प्रतीक आहे. भगवान शंकर ध्यानमग्न असतात त्यावेळी त्यांचे मनात काय कशाचे कोणाचे विचार ते करत असतात ते लपविण्यासाठी तर हा जटाभार धारण नाही ना केला? असेही वाटते. या जटांमध्ये विलक्षण शिवशक्ती आहे. जटेचा एक केस उपटून आपटला जमिनीवर व त्यातनू दक्षनाश करणारा वीर निर्माण केला ही पौराणिक कथा येथे आठवते. विलक्षण अहंकार, वेग, तीव्रता या जटाभारत ते बांधून टाकतात व पृथ्वीचे व लोकांचे कल्याण करतात. हे एकप्रकारचे शिवसामर्थ्य कवच

आहे. ही शिवशक्ती आहे. शिवसामर्थ्य भंडार आहे. तांडव नृत्यात ते मुक्त होते व अन्यवेळीसंचयित रुपात ते बांधलेले असते. यावर अन्य काही माहिती असल्यास वाचकांनी मला कळवावी म्हणजे माझ्या ज्ञानात भर पडेल असे मला वाटते.

६) तृतीय नेत्र : त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र) येथील ज्योतिर्लिंग उत्पत्ती संबंधी असे म्हणतात की या क्षेत्रास त्र्यंबकेश्वर म्हणण्याचे कारण येथे त्रिनेत्रधारी शंकर भगवान विराजमान आहेत म्हणजे त्र्यंबक (तीन नेत्र) धारी ईश्वर येथे आहेत. शंकरांचे तृतीय वा तिसरा डोळा याचे रहस्य काय? प्रतीकार्थ काय? या संबंधी काही विचारधारा येणेप्रमाणे आहे :-

अ) योगसाधनेच्या संदर्भाने याचा प्रतीकार्थ असा सांगतात की कुंडलिनी शक्ती जेव्हा षट्चक्र भेदते तेव्हा आत्म्याचा तिसरा नेत्र मलशून्य होतो व तो नेत्र स्वच्छ व प्रसन्न होतो.

ब) शंकरांचा तिसरा नेत्र दाखवितो की ते केवळ दोन नेत्रांचे अधिपती नाहीत म्हणजे केवळ इडा व पिंगळा नाड्यांचेच स्वामी नाहीत. ते अजपा-जपाचे साधक आहेत. यामध्ये म्हणजे या अवस्थेत सूक्ष्मरुपातील प्राण डाव्या बाजूस स्थित इडा व उजव्या बाजूस स्थित पिंगला यांच्या स्थानात मध्यभागी स्थित सुषुम्ना नाडीच्या वर खाली संचार करू लागतो व कधी कधी स्थिर होऊ लागतो. समाधी लागू लागते. आत्मा परमात्माचे एकत्व स्थापित होते. ही समरसता व समरसीकरण आहे, हाच स्वभाव आहे, समरसभाव आहे, अद्वैतावस्था आहे, चिदानंदमय अद्वैत निष्ठा आहे व द्वैत तसेच अद्वैत यांचे अंतीम परम तत्त्व आहे.

क) कुमारस्वामीनी हा तृतीय शिवनेत्रास प्रमस्तक (सेरिब्रम) याचे पीयूष ग्रंथी (पीनिअल ग्लँड) मानले आहे. ही पीयूष ग्रंथी त्या सर्व ग्रंथींवर नियंत्रण ठेवते ज्यांच्याशी तिचा संबंध येतो/असतो. या कुमारस्वामींनी पीयूष ग्रंथीला जागृत, स्पंदन करण्याची तसेच विकसित करण्याच्या प्रक्रियांचेही विवेचन केले आहे. अध्यात्म साधनेत ध्यानावस्थेत चेतना केन्द्रीभूत होवून पीयूष ग्रंथीत स्थिर होते. या अवस्थेत साधक समाधिसुख अनुभवतो. याच अवस्थेत साधकाची चेतना व विश्वचेतना तादात्म्य पावते. जीवाशिवाची अनुभूती एक होते. जीवाशिवाची जडते समाधी ती याच अवस्थेत.

याच तिसऱ्या नेत्राने भगवान शंकरांनी कामदेवाचे दहन केले होते. खऱ्या ज्ञानवंतावर कामाचे प्रहार/आघात कुचकामी ठरतात. एवढेच नव्हे तर खरा ज्ञानी स्वतःचे ज्ञानाग्नीने कामनांना जाळून टाकतो.

७) नटराज : नटराज शिवाचे नृत्य हे गतीमान सार्वभौम ब्रह्माण्डाचे प्रतीक आहे. चार हात चार दिशा (पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण) प्रतीक आहेत. त्रिदेव रुपात नटराज हे एक ब्रह्माण्डनर्तक आहेत व ते भ्रष्ट लुळ्यापांगळ्या अपंग झालेल्या ब्रह्माण्डास नष्ट करून ब्रह्मदेवास सृष्टी पुन्हा निर्माण

करण्यासाठीच नृत्य करतात. या नृत्यासच तांडव म्हणतात जे प्रलयंकारी मानले जाते. दक्षिण भारतात मात्र यास आनंद तांडव म्हणतात.

शिवतांडव शंकराचे क्रोधाचे प्रतीक आहे, यातून त्यांच्या प्रलयकारी रौद्र स्वरुपाचा बोध होतो. हे रौद्र तांडव करणारे शिव रुद्र आहेत. आनंद तांडव करणारे शिव नटराज आहेत. असे मानतात की आनंदतांडव हे सृष्टीचे अस्तित्व व रौद्रतांडव हे सृष्टीचा विलय दाखविते. या दृष्टिकोनातून हे ब्रह्माण्डाचा उदय/निर्मिती व विलय दाखविते. याला असेही संबोधतात की हे शिवशंकरांचे परस्पर विरोधी भावाचे प्रतीक आहे. भगवान शंकर हे नटराज याअर्थी आहेत.

भगवान शंकर कामेश्वर, अर्धनारीनटेश्वर असून कामावर विजय मिळविलेले, योगी आहेत, गृहस्थी असूनही स्माशानवासी आहेत, आशुतोष व शांत प्रसन्न सौम्य असूनही भयंकर रुद्र आहेत, तसेच ते स्थिरावस्था व गतीमान अवस्था यांचेही प्रतीक आहेत.

भगवान शिव बर्फाच्छादीत धवल कैलास या गिरीशिखरावर विराजमान आहेत ते हे दाखविते की ज्ञानाची बैठक विशुद्ध हवी. चारित्र्याचे शुद्ध निष्कलंक धवल बैठकीशिवाय ज्ञानास शोभा नाही. उत्तुंग शिखर बैठक दाखविते की साधकाने जीवनात निश्चित उंची गाठली पाहिजे. कल्याणाचा मार्ग अवघड काटेरी असतो व श्रेयप्राप्तीसाठी अनेक कष्ट घेणे, चढ पार करावे लागणे करावेच लागते. दुर्दम्य इच्छेने कठीण साधनेशिवाय उच्चतत्व वा शिवत्व मिळत नाही व सामान्य गोष्टी त्यागूनच हा अवघड मार्ग क्रमल्याशिवाय शिवत्वाची दिव्य झळाली प्राप्त होत नाही.

शंकरांची दिगंबरावस्था म्हणजे त्यांनी दशदिशांचे वस्त्र परिधान केले आहे, त्यांना वस्त्रात कोण गुंडाळणार? सर्व वस्त्रे अपूरीच पडतील. जे तत्त्व समस्त विश्वास आच्छादिते त्याला आच्छादनाची काय गरज आहे. शंकर भगवान समग्र सृष्टीस व्यापूनही शेष आहेत त्यास कोणतेच वस्त्र आच्छादू शकत नाही.

शिवमंदिरात नंदी व कासव असतेच. नंदी शिवाचे वाहन आहे. शिवपिंडीवर सतत जलाभिषेक करणारे अभिषेक पात्र असते वर टांगलेले. शिवपिंडीला भस्मार्चन करतात. शैव नेहमी आडवे गंध लावतात. शिवास बिल्वपर्ण व मंदारपुष्पे प्रिय असतात. ते गजचर्मधारीही दाखवतात चित्रात. रुद्राक्ष शंकराचे अश्रुतून निर्माण झाले असे सांगतात व रुद्राक्ष शरीरावर धारण करतात. जपास रुद्राक्ष माळ वापरतात. रुद्राक्ष पूजेतही ठेवतात. रुद्राक्षजल हे औषधीसारखे वापरतात इ. ही सर्व शिवाशी निगडीत आहेत, एवढेच येथे लिहितो. शिव मंत्र, स्तोत्रे, कवच इ. व ग्रंथ शिवपुराण, शिवलिलामृत इ. येथे उल्लेख करत नाही. हे सगळे वेगळे विषय आहेत. त्यावर स्वतंत्र लेख पुढेमागे लिहिण्याचा मानस आहे.

लेखांती उपनिषदातील पुढील उल्लेख करतो.

(पृष्ठ २५ वर)

# सनातन धर्म, वर्ण व जाती जगभरच्या अखिल मानवजातीला लागू आहेत

**वसंत नारायण देशमुख**

१. सनातन धर्म, वर्ण व जाती जगभरच्या अखिल मानवजातीला लागू आहेत व ते कसे लागू आहेत ह्याचे स्पष्टीकरण पुढे येईल. पण वर्णभेद च जातिभेद हे इतरत्र केले जात नाहीत कारण वर्ण व जाती ह्यांची भारताबाहेरच्या इतर लोकाना माहितीच नाही. हे भेद केवळ भारतातच केले जातात म्हणून त्यांना व्यवहारातून नष्ट करण्याचा प्रयत्न करण्याचा श्रीमद्भगवद्गीतेवरआधारित असा एकमेव उपाय ह्या लेखांत दिला आहे.

२. समर्थ रामदासस्वामी म्हणत आपणासी जे ठावे इतरासी सांगावे । शहाणे करावे सकळ जन ।। ह्यांत दोन हेतू आहेत. आपली माहिती उत्तम असेल तर प्रश्नच नाही. पण जर ती चुकीची असेल व दुसऱ्या माणसाला योग्य माहिती असेल तर तो आपली चूक सुधारेल. माझ्याकडे कांही तरूण आले होतें, त्याना आपल्या मायबोलीसाठी कांहीतरी करण्याची इच्छा होती. त्यातल्या एकाला त्याचे नांव व तो काय करितो हे विचारले. त्याला वाटले की मी त्याची जात विचारली. तो म्हणाला तो हिदू न्हावी आहें. मी त्याला विचारले की न्हावीपण हा एक व्यवसाय आहें तर त्याचा व्यवसाय काय आहें? तो कुठेतरी कारकून होता. मी त्याला म्हणालो मग कसला तू न्हावी? जाती ह्या केवळ व्यवसायदर्शक असतात व म्हणूनच सबंध जगभर त्या आहेतच पण तेथे जातिभेद नाहीत. पण हिंदु ह्या शब्दाशी जाती निगडीत झाल्या आहेत व त्यांत उच्च्य नीचता आणली गेली म्हणूनच त्या नष्ट करून एकजिनसी असा भारतीय समाज निर्माण करणे, हेच आपले मुख्य कार्य आहें. तसेच जैन बौद्ध, शीख इत्यादी सर्व भारतांत निर्माण झालेल्या पंथांना एकत्र करणे (हे पंथच आहेत, धर्म नव्हेत कारण धर्म ह्या शब्दाचा अर्थ कर्तव्य असा आहे. उदाहरणार्थ मातृधर्म म्हणजे आईची मुलांविषयीची कर्तव्ये) खरे पन्थाना. (हिंदू हा धर्मही नाही वा पंथही नाही. पर्शियन लोक सप्तसिंधू च्या जागी 'हप्तहिंदु' म्हणत असत कारण त्याना 'स' उच्चार करिता येत नसे. त्यांनी आपल्याला दिलेले ते एक नांव आहे एवढेंच .) आपल्याला आवडो वा नावडो, हिंदू म्हटले की दलित लोकाना शिवी दिल्यासारखे वाटते व ते चुकीचे नाही इतकी वाईट वागणूक त्याना सहस्रावधी वर्षे दिली गेली आहें. ह्याच्यावर उपाय काय तर हिंदू हा सर्वस्वी परकीय शब्द फेकून देऊन ''भारतीय'' हा शब्द उपयोगांत आणणे. ह्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेल्या हिंदु धर्माच्या व्याख्येंत मी अल्पसे वेगळेपण घातले आहें. ते असे.

(क) स्वातंत्र्यवीर सावरकरांची व्याख्या

आसिंधु सिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरितिस्मृतः।। श्चैव

(ख) नवीन व्याख्या

आसिंधु सिन्धुपर्यन्ता यस्य भारतभूमिका।
मातृ-पितृभूः पुण्यभूश्चैव स वै भारतीति स्मृतः ।।

ही व्याख्या घेतली की उत्स्फूर्तपणे

वंदे मातरम म्हणणारे सर्वच भारतीय धर्माचे होतील मग ते देव मानू देत वा न मानू देत. सर्व जाती नष्ट होतील. जात ही जन्माधिष्ठित नसेल तर कर्माधिष्ठित असेल. आता वर्णाविषयी.

३. श्रीमद्भगवद्गीतेच्या ४ थ्या अध्यायातला १३ वा श्लोक पाहा.

चातुर्वर्ण्यम् मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विध्द्यकर्तारमव्ययं।।१३।।
अ. ४.

अर्थ :- गुण व कर्माप्रमाणे मी चार वर्ण निर्माण केले आहेत. त्यांचा कर्ताही मी आहें व अकर्ताही मलाच जाण.

म्हणजे वर्ण हे जन्माधिष्ठित नाहीत तर गुण-कर्माधिष्ठित आहेत. म्हणजेच वर्णाचा आई व वडीलांच्या वर्णाशी कांहीही संबंध नाही. ह्याचे कारण हे की जेंव्हा आईच्या पोटांत गर्भधारणा होतें तेंव्हा तेथे एक शरीर उत्पन्न झालेले असते पण त्यांत जीव नसतो पण जीवन असते. आता हे कसे? हा प्रश्न आपल्या मनांत येईलच. त्याचे उत्तर हे की पुंबीजांत जीवन असते पण जीव नसतो. तसेच स्त्रीबीजांतही जीव नसतो पण जीवन असते कारण दोघांतही जर जीव असेल तर त्यांचे मिलन झाल्यावर जगांतले पहिले महायुद्ध त्या शरीररूपी घरांत कोणी राहावयाचे ह्यासाठीच होईल. ह्याला आधार आहें श्री अक्कलकोट स्वामी समर्थांच्या चरित्र स्तोत्रांतले श्लोक क्रमांक ८४ ते ८७ या श्लोकांचा व श्री गुरुचरित्रातल्या ४५ व्या अध्यायांतले श्लोक ७२ ते ७९ श्लोकांचा. यातील दोन श्लोक खाली दिले आहेत.

(क) मासे एक पिंड होय । द्वयमासी शिरपादद्वय ।
त्रयमासी सर्व अवयव । नवद्वारे झाली मग ।। ७४ ।। गुरुचरित्र अ. ४५.

(ख) पंचतत्वे होती एक । पृथ्वी वायू तेज आकाश उदक ।
प्राण आला तात्कालिक । तधी स्मरण कैचे मज ।। ४६ ।। गुरुचरित्र अ. ४५.

ह्या श्लोकान्वये गर्भधारणेनंतर तीन महिन्यानंतर आपले गुणकर्मांचे गाठोडे घेऊन एक जीव त्या गर्भांत राहायला येतो. तो सात्त्विक गुणी असेल तर ब्राह्मण असतो मग त्याचे आईवडील कोणीही असोत. म्हणूनच डॉ. आंबेडकर हे ब्राह्मणच होतें व सद्ध्या ब्राह्मण म्हणवणारे बरेच लोक वैश्यच असतात. माझे आई व वडील हे उत्तम असे चित्पावन अर्थांत कोंकणस्थ ब्राह्मण होते पण मी जन्मापासूनच एक लढाऊ (भांडखोर मुळीच नाही.) असा पण शुद्ध शाकाहारी क्षत्रीयचं आहे. परमेश्वराच्या योजनेप्रमाणे त्यांत उच्च नीचपणा नसतो. बरे हा नियम काही भारतापुरताच देवाने केला नाही जगांत कुठेही मनुष्य जन्मला की तो ह्यापैकी एका वर्णाचा असणारच. तसेच जातीही म्हणजेच व्यवसायही जगभर तेच आहेत. पण जगभरच्या इतर लोकांना हे ज्ञानच नसल्याने त्यांच्यांत असे भेद प्रकर्षाने नाहीत. मग ह्या भेदांनी झालेल्या आपल्या अपरिमित हानीपासून काहीतरी शिकून आता तरी आपण ह्या भेदांना तिलांजली द्यायला नको का ? असो तर हे झाले सनातन धर्म, जाती व वर्णाविषयी व हे सर्व सबंध जगभरच्या सर्व

(पृष्ठ १९ वर)

## श्रीमद्भागवत सप्ताह परंपरा - प्रस्तावना

कलियुगात तीन गुण अतिशय दुर्मिळ आहेत. मनुष्यत्व, मुमुक्षुत्व आणि महापुरुषसंश्रय. मनुष्य या तीनही गोष्टींसाठी प्रयत्नशील असतो. मनुष्यत्व हे त्याला स्वतःला साध्य करता येण्यासारखे आहे. तर महापुरुषसंश्रय म्हणजेच संतसंगती लाभणे दैवदुर्लभ आहे. मुमुक्षुत्व म्हणजे मोक्ष अर्थात आत्मज्ञान मिळवण्यासाठी मनुष्याच्या मनात जेव्हा इच्छा निर्माण होते तेव्हा तो ज्ञान, भक्ती आणि कर्म यांपैकी प्रकृतीस अनुकूल असा मार्ग निवडतो आणि अग्रेसर होतो. यासाठी सहज उपलब्ध असलेला सुगम मार्ग म्हणजे श्रीमद्भागवतपुराणावर आधारित संपन्न केला जाणारा श्रीमद्भागवत सप्ताह हा होय. श्रवण, कीर्तन, स्मरण यासारख्या नवविधा भक्तींचे प्रकटीकरण असलेला आणि या माध्यमातून साधकांना उन्नत्तीस नेणारा असा हा मार्ग आहे. पुराणाशी निगडित असूनही आधुनिक काळातही हा मार्ग लोकप्रिय झाला आहे. १८ पुराणांपैकी श्रीमद्भागवतपुराण हे एकमेव असे पुराण आहे की ज्यावर आधारित असलेली सप्ताह परंपरा प्राचीनकाळापासून रूढ आणि प्रवाहित होत राहिली आहे. कोणत्याही लोकप्रिय गोष्टीबद्दल भिन्न भिन्न मते रूढ होत असतात. भारताच्या विविध भागांमध्ये संपन्न होणा-या तसेच अनुष्ठानाच्या विविध पद्धती असलेल्या या परंपरेविषयीदेखील असे म्हणता येते. प्रत्यक्ष भागवत पुराणाचा अभ्यास असणारे आणि याविषयी अधिकृतपणे माहिती असणारे लोक तुलनेने कमी आढळतात. त्यामुळेच या परंपरेविषयी माहिती देऊन विषयाबद्दल स्पष्टता आणण्यासाठी या लेखमालेचा प्रपंच केला जात आहे. त्यातील प्रस्तावनारूपी प्रथम पुष्प या प्रथम लेखाच्या आधारे ओवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या सप्ताहरूपी परंपरेचा भागवतपुराण हा आधारभूत ग्रंथ असल्याने या प्रस्तावनारूपी लेखात आपण पुराण वाङ्मयाचा उगम आणि विकास, वैदिक वाङ्मयाशी जोडली गेलेली नाळ आणि त्या वाङ्मयाचे कर्ते व्यास तसेच पुराणांचे पंचलक्षण, संख्या, नामनिर्देशइत्यादी मुद्द्यांचा विचार करणार आहोत. भागवत सप्ताह समजून घेण्यापूर्वी ते ज्या पुराणावर आधारित आहे त्या् संपूर्ण पुराण-वाङ्मयाची पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक ठरते. त्यामुळे भागवतपुराणाच्या उगमाविषयी, रचनेविषयी, वैदिक संस्कृतीशी असलेल्या संबंधाविषयी तसेच त्यामधील आख्यानांविषयी व इतरही अनेक गोष्टींविषयी स्पष्टता येण्यासाठी मदत होईल. यासाठी हा लेख एकूण पुराण वाङमयाची माहिती देणारा आहे.

### पुराण वाङ्मयाचे अस्तित्व

इतिहास-पुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।
बिभेत्यल्पश्रुताद् वेदो मामयं प्रहरिष्यति ।।

श्लोकार्थः- इतिहास आणि पुराणांच्याद्वारे वेदांना समजून घ्यावे. अन्यथा अल्पश्रुत माणसाची वेदाला अशी भीती वाटते की हा (असा अल्पश्रुत मनुष्य) माझ्यावर आघात करेल.

महाभारतात आदिपर्वामध्ये हा श्लोक आला आहे. प्रस्तुत श्लोकामध्ये वेद, इतिहास आणि पुराण या तीनही वाङ्मयांचा संदर्भ आला आहे. यातील इतिहास म्हणजे महाभारत आणि पुराण म्हणजे पुराण वाङ्मय होय. यासंदर्भावरून या तिन्हींचा एकमेकांशी असलेला संबंध अधोरेखित होतो. या श्लोकातील समुपबृंहयेत् हे क्रियापद महत्त्वाचे आहे. बृंह् याधातूचा अर्थ विस्तार करणे असा आहे. त्याला सम् आणि उप असे दोन उपसर्ग लागलेले आहेत ज्यामुळे या धातूचा अर्थ केवळ विस्तार करणे एवढाच मर्यादित न राहता योग्य रीतीने सिद्धांताची पुष्टी करणे त्याची अनेक अंगांनी वाढ करणे असा होतो. वेदांमध्ये बीजरूपाने असलेले तत्त्वज्ञान हे कथांच्या माध्यमातून, सामान्यासही कळेल अशा भाषेमधून सोपे करून सांगणे हे अपेक्षित आहे. अशा पद्धतीनेच वेद समजण्यास सुगम होतात. म्हणूनच वरील श्लोकात इतिहास आणि पुराणांच्याद्वारे वेदांना समजून घ्यावे असे म्हटले आहे. ज्याप्रमाणे बीज हे अव्यक्त असते आणि नवीन रोपांच्या रूपाने व्यक्त होते तशीच घटना वेद इतिहास आणि पुराणांच्या बाबतीत घडताना दिसते. याबद्दलची उदाहरणे पुढील लेखांमध्ये येतीलच त्यावरून हे अधिक स्पष्ट होईल.

'वेदोऽखिलं धर्ममूलम्।' या मनुस्मृतीमधील वचनानुसार संपूर्ण धर्माचा आधार वेद आहे. जगातील उपलब्ध वाङ्मयापैकी सर्वात पुरातन असे वाङ्मय वेदवाङ्मय मानले जाते. वेद हे केवळ वाङ्मय नसून येथील संस्कृतीचा आधार आहेत. आपण सर्व जाणतो की वेदवाङ्मय म्हटले की त्यामध्ये वेद, ब्राह्मणे, उपनिषदे, आरण्यके इत्यादींचा समावेश होतो. ही वेदराशी निर्माण होताना हजारो वर्षांचा काल लोटला आहे. आणि त्यात स्थित्यंतरे घडली आहेत. प्रामुख्याने यज्ञसंस्कृती म्हणून ओळखली जाणारी संस्कृती ही कालौघात केवळ यज्ञाधारित राहिली नाही. स्तवन, लघु-यज्ञ, मोठे यज्ञ मग पुढे संपूर्ण समाजव्यापक यज्ञसंस्था, पुढे त्यातून निर्माण झालेले तत्त्वज्ञान असा वैदिक वाङ्मयाचा प्रवास पहावयास मिळतो. हेच तत्त्वज्ञान, इतिहास, पुराणांनी सामान्यांपर्यंत नेले. त्यामुळेच भारतीय परंपरेत वेदांइतकेच इतिहास आणि पुराणांना महत्त्व प्राप्त झाले.

आता ज्या भागवतपुराणाविषयी ही लेखमाला आहे त्या पुराण वाङ्मयाचे नेमके स्वरूप, विषय इत्यादींविषयी थोडक्यात जाणून घेऊ.

**पुराणं पञ्चलक्षणम्।**

परंपरेनुसार पुराण या नावाने जी वाङ्मयराशी उपलब्ध आहे त्यामध्ये १८ पुराणे तसेच अनेक उपपुराणे अंतर्भूत आहेत. पण या वाङ्मयाचे पुराण हे नामकरण आहे त्यावर प्रकाश टाकताना पुराणांचाच आधार घ्यावा लागतो. अथर्ववेद, शतपथब्राह्मण, उपनिषदे इ. वैदिक वाङ्मयामध्ये पुराणांचा निर्देश आढळतो परंतु त्याचे नेमके स्वरूप कसे असावे याविषयी माहिती मिळत नाही. व्युत्पत्तीशास्त्रानुसार यास्काचार्यांनी 'निरुक्त' या ग्रंथामध्ये 'पुराण' या शब्दाची व्युत्पत्ती 'पुरा नवं भवति।'अशी दिली आहे. जे पुरातन असूनही नित्यनूतन भासते ते पुराण असे ते म्हणतात. खरोखरीच ही निरुक्ती पुराणांना

लागू पडते. कारण आजही पुराणे वाचली जातात त्यावर निरूपण केले जाते. तरीही ही निरुक्ती या वाङ्मयाची लक्षणे स्पष्ट करण्यास असमर्थ आहे. त्यासाठी पुराणांमधील श्र्लोकांचाच आधार घ्यावा लागतो. अनेक पुराणांमध्ये पाच लक्षणे दिलेली आहेत आणि असे पंचलक्षणात्मक साहित्य म्हणजे पुराण असे म्हटले आहे. उदाहरण म्हणून बघायचे झाल्यास कूर्मपुराणातील पुढील श्लोकाद्वारे ही पंचलक्षणे आणि पुराण याबद्दल पुढील वर्णन आढळते.

सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।
वंशानुचरितञ्चैव पुराणं पञ्चलक्षणम् ।।

सर्ग म्हणजे निर्मिती, प्रतिसर्ग म्हणजे प्रलय, वंश म्हणजे देवांच्या आणि ऋषींच्या वंशकथा, मन्वन्तर म्हणजे कालमानाशी निगडित तसेच प्रत्येक मन्वन्तराचा अधिपती याविषयीचे कथन, वंशानुचरितम् म्हणजे श्रेष्ठ क्षत्रिय वंशातील राजांचे तसेच महर्षींचे वर्णन. हे ५ विषय जेथे प्रामुख्याने हाताळले जातात असे साहित्य म्हणजे पुराण होय. पुराणांचे अवलोकन केले असता हे विषय विस्तृतपणे मांडलेले दिसतात.

**पुराणांचा कालखंड**

पुराण वाङ्मयाचा नेमका कालखंड सांगता येत नाही. जनमानसांत पुराण हे वेदांइतकेच पुरातन आहे असे मानले जाते. त्यामध्ये कोणते प्रथम कोणते शेवटचे असे नेमकेपणाने सांगता येणे कठीण आहे. अभ्यासकांनी विश्र्लेषणानंतर त्यांचे पौर्वापौर्व पाहाताना या विषयावर प्रकाश टाकला आहे. त्यानुसार पुराण नावाचे वेगळे वाङ्मय वैदिक कालखंडात उपलब्ध नव्हते. तरीही पुराणांमधील विषयांशी साम्य दाखवणाऱ्या गाथा, आख्याने मात्र या काळात अस्तित्वात होती. ऋग्वेदात अशा जवळजवळ ४० गाथांचा समावेश आहे. दानस्तुती, गाथा या आश्रयदात्या राजाच्या स्तुतीपर गाईल्या जात. त्यामुळेच त्यामध्ये ऐतिहासिक भांडार समाविष्ट आहे असे अभ्यासकांचे मत आहे. त्याचबरोबर यज्ञामध्ये विधींच्या आधी आणि विधींच्या नंतर आख्याने गाईली जात. असेच एक आख्यान 'पारिप्लवाख्यान' या नावाने प्रसिद्ध आहे. या सर्व गोष्टींमधून असे लक्षात येते की जनमानसांत गाथा, आख्याने इत्यादी स्वरूपात प्रसिद्ध असणारे प्रचंडसाहित्य उपलब्ध असावे व त्याचेच संकलन करण्याच्या दृष्टीने पुराणांची निर्मिती झाली असावी. साधारणपणे इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून अशा साहित्याला पुराण वाङ्मय म्हणून स्वतंत्र ओळख मिळू लागली होती. हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र या ग्रंथानुसार इ.स. पूर्व ३रे शतक ते साधारणपणे इ.स.९वे शतक या कालखंडामध्ये पुराणांची रचना होत राहिली. म्हणजे आज ज्या स्वरूपात पुराणे उपलब्ध आहेच त्या स्वरूपात त्यांची रचना होत राहिली. त्यानंतरही उपपुराणे ही रचली जातच होती. म्हणूनच वेदवाङ्मयापासून पुराणवाङ्मय हे संपूर्णतया भिन्न नसून त्याचाच एक भाग आहे असे आढळते.

**वेदव्यास आणि पुराण**

परंपरेने पुराणांचे कर्तृत्व हे व्यासांना दिले जाते. व्यासांनी वेदांची विभागणी केली म्हणून त्यांना वेदव्यास असे म्हटले जाते. वेद आणि पुराणांच्या रचनाकालामधील

तफावत पाहता पुराणांच्या रचनेचे श्रेय हेदेखील व्यासांकडे कसे हा प्रश्न निर्माण होतो. पूर्वी सांगितल्याप्रमाणे पुराणांमधील अनेक आख्याने ही वैदिक कालखंडापासून चालत आलेल्या व्यक्तिरेखांविषयी आहेत. त्यामधील अनेकांचा ऋग्वेदांमधील आख्यानांशी थेट संबंध आहे. व्यासांनी इतिहास म्हणजेच महाभारत ग्रंथ रचला ज्यामधील अनेक आख्याने पुराणांमध्ये आढळतात. अशा रीतीने वैदिक वाङ्मय, इतिहास, आख्याने यांचा थेट संबंध व्यासांशी असल्यामुळे पुराणांचे कर्तृत्वदेखील व्यासांकडे दिले गेले असावे.

विष्णु पुराणातील एक संदर्भ देऊन उपाध्याय या आधुनिक विचारवंतानी असे म्हटले आहे की व्यास ही कोणी एक व्यक्ती नसून ते एक पीठ आहे.त्या् पीठावरील व्यक्तीला व्यास संबोधले जात असावे. तसेच व्यासांच्या २७ अवतारांचा उल्लेख विष्णुपुराणाने केला आहे. तर देवीभागवतपुराणातील संदर्भानुसार प्रत्येक युगात विष्णु हे व्यासांचा अवतार घेऊन पुराणांच्या संहिता निर्माण करतात. एवम् व्यासांनी ज्ञान समाजात प्रसृत केले म्हणून त्यांच्याकडे पुराणांचे कर्तृपद दिले गेले असावे. त्याचप्रमाणे त्याचे लिखित स्वरूपात रचना करण्याचे कार्य ज्यांनी केले तेही या अर्थी व्यासच मानावे लागतील.

**पुराणांची संख्या आणि त्यांचे भेद**

अशा प्रकारे आज अठरा पुराणे उपलब्ध आहेत आणि त्यांच्या आद्याक्षराने निर्मिलेल्या देवीभागवतपुराणातीलश्लोकाद्वारे अत्यंत थोडक्यात स्मरण करता येते.

मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं वचतुष्टयम् ।
अनापलिङ्गकूस्कानि पुराणानि पृथक् पृथक्।।
(मद्वयम् -मार्कंडेय, मत्स्य;
भद्वयम् - भविष्य, भागवत;
ब्रत्रयम् - ब्रह्म, ब्रह्मांड, ब्रह्मवैवर्त;
वचतुष्टयम् - वायु, विष्णु, वामन, वराह;
अनापलिङ्गकूस्कानि - अग्नि, नारद, पद्म, लिङ्ग, गरुड, स्कंद, कूर्म.)

एकूण पुराण यादीमधील केवळ दोन पुराणे ही महापुराणे म्हणून प्रसिद्ध आहेत. एक भागवत आणि दुसरे ब्रह्मवैवर्तपुराण. त्यापैकी भागवतपुराणावरील ही लेखमाला आहे. या प्रस्तावनेच्या पार्श्वभूमीवरून येथून पुढे प्रत्यक्ष भागवतपुराणाबद्दलची प्राथमिक माहिती घेऊन सप्ताहाविषयीच्या विषयासंबंधीचे विवेचन सुरू केले जाईल.

इति शम् ।

**दिशा प्रसादे**
ठाणे

●●●

(पृष्ठ क्र.१५ वरून...**सनातन धर्म, वर्ण व जाती जगभरच्या अखिल मानवजातीला लागू आहेत** )

लोकांना लागू आहेत. पण भारत वगळून इतरत्र असलेल्या सर्व लोकांना ह्याची माहितीच नाही एवढेंच.

**वसंत नारायण देशमुख**
विधिज्ञ विंग कमांडर (निवृत्त)
ए-२/५०४, श्रीराम व्हाईट हाऊस,
६ वा मेन, १५ वा क्रॉस, आर. टी. नगर,
बेंगळुरू, कर्नाटक राज्य - ५६००३२
दूरध्वनी क्रमांक : ०८०-३६९२१८०
भ्रमणध्वनि : ९६८६५४५०९३

परमार्थ म्हणजे ईशप्राप्तीचा, मोक्षाकडे नेणारा एकमेव मार्ग आहे. परमार्थात प्रगती होऊन मोक्षाचे अंतिम गन्तव्य स्थान गाठले तरच जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होते, हा वेदविद्येचा मूलभूत सिद्धांत आहे.

संसारात प्रामाणिकपणाने कष्ट करून विद्या-धन-प्रतिष्ठा यांचा लाभ झाला, तरी परमार्थ ह्या चतुर्थ पुरुषार्थाविना ब्रह्मप्राप्ती म्हणजेच मोक्ष मिळणे केवळ अशक्य आहे.

मनुष्य प्रपंचात गुंतला की तो परमार्थ-मार्गापासून दूर जातो. म्हणून प्रपंच हाच परमार्थ-मार्गावरचा मुख्य अडसर आहे. असे संन्यासमार्गीयांकडून प्रतिपादन केले जाते. परंतु ते बरोबर नाही असेच श्रीगोंदवलेकर आदी संतांचे सांगणे आहे. कामेच्छा, धनलोभ, भयद्वेषमत्सरादी, मनोविकार, अहंकार, अप्रामाणिकपणा, दुराचार हेच परमार्थाच्या मार्गातील मुख्य अडसर आहेत, आणि हे दोष संसारी माणसाने टाळले तर 'प्रपंच' हा परमार्थाच्या आड न येता तो परमार्थ-साधनेचे मुख्य साधनच कसे बनू शकतो हीच भागवत धर्माची मुख्य शिकवण समजावून सांगते. श्री गोंदवलेकर महाराज या संदर्भात असे म्हणतात की, 'वासना व मनोविकार हे ईश्वरानेच निर्माण केले आहेत. (मन, बुद्धी आणि वाणी या तीन गोष्टी ईश्वरानेच मानवाला बहाल केल्या आहेत) आणि म्हणून वासनादी मनोविकार हे अगदीच टाकावू नसून त्यांचा योग्य उपयोग करून त्यांना परमार्थाकडे वळवल्यास त्यांचा परमार्थ साधनेला चांगला उपयोग होऊ शकतो; फक्त माणसाने या विकारांचे दास न होता त्यांनाच आपले दास बनवले पाहिजे.'

त्याग-दान-परोपकारादी परमार्थाची मुख्य साधने आहेत. पण ती सुद्धा अहंकार, अभिमान व मी कर्ता ही भावना, ठेवून केल्यास फलद्रूप होत नाहीत.

अभिमान अहंकार, मी कर्ता हीच भावना।
जोवरी सोडिना अम्हां परमार्थचि होइना।।
ना.गी.अ.१०/३१

काही भौतिक भोग मिळावे या स्वार्थबुद्धीने केलेल्या धर्मकृत्यांनी परमार्थ साधू शकत नाही.

उपकार चि केला जो स्वार्थबुद्धीच ठेवुन।
परमार्थीच ये आड न होईच फलप्रद।।१०/२३

उपकार खरा तोची केला जो निःस्पृहे मनें।
मानून ईशसेवा ती, परमार्थचि तो घडे।।१०/२४

लाभण्या विषयी वस्तू केली जी नामसाधना।
यात्रा नी व्रतवैकल्ये साधती परमार्थ ना।।१७/३०

वस्तुभोगांचे दान किंवा त्याग हाच परमार्थाचा पाया आहे, परंतु ते दान अभिमानाने, मान-सन्मान मिळावा अशा स्वार्थबुद्धीने केलेले नसावे. म्हणून श्रीगोंदवलेकर महाराजांचे सांगणे आहे की, 'स्व'च्या दानाशिवाय केलेले धनाचे दान

सात्त्विक होत नसल्यामुळे परमार्थात उपयोगी पडत नाही. म्हणून अहंकार 'मी कर्ता' ही भावना मारणे ही परमार्थाची पहिली पायरी आहे. परंतु अभिमान केव्हा व कसा मनात शिरतो हेच कळत नसल्यामुळे तो काढून टाकणे हे मोठेच कठीण असते.

अहंकार आणि कायेच्या मीलनातून वासना (ईच्छा) निर्माण होते.

ज्ञानेश्वर महाराज गी.अ.७/२४ या श्लोकावर टीका करताना म्हणतात – (अनुष्टुप ज्ञानेश्वरीतील श्लोक असे आहेत)

थोड्यात सांगतो ऐका संसाराची अशी कथा।
अहंकार नि कायेचे जमले प्रेम एकदा।।७/१६५

मीलनीं मुलगी त्यांना 'इच्छा' (वासना) नामेंच जन्मली। यौवनात चि येताची, द्वेषाशी लग्न ती करी।। ७/१६६

विषयभोगांच्या विचारातच मन रमले की काम–वासना निर्माण होते, इप्सित वस्तू न मिळाल्यास अस्वस्थता व क्रोध निर्माण होतो व ती वस्तू मला न मिळता दुसऱ्यास मिळाल्यास हेवा मत्सर द्वेष आदि निर्माण होतात आणि शेवटी वासनेची परिणती शेवटी सर्व नाशात कशी होते, ते गी. अ.२ श्लोक ६२,६३ मध्ये छान वर्णन केले आहे.

ध्यायतो विषयान्पुसः संगस्तेषूपजायते।
संगात् संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते।।

क्रोधाभ्दवति संमोहः संम्मोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ।।६३।।

मराठीत

विषयी ध्यास होताची उभ्दवे पार्थ संग तो।
उभ्दवे काम संगाने कामापासून क्रोध तो।।६२।।

क्रोधाने होय सम्मोह सम्मोहाने स्मृतिभ्रम।
बुद्धिनाश भ्रमाने तो अंती जो सर्वनाशक।।६३।।

कामोपभोगांच्या वासनेची विशेषता म्हणजे ती अशमनीय आहे, तिची तृप्ती कधीच होऊ शकत नाही. माणसाला एक लाख रुपये मिळविण्याची वासना झाल्यावर त्याला ते मिळाले की त्याच क्षणी त्याला दहा लाख रुपये मिळावेत अशी वासना उत्पन्न होते. म्हणून वासनेला अग्नीची उपमा दिली जाते. अग्नीत सरपण घातल्यावर तो अग्नी आणखीनच पेटतो व सरपणाची राख करण्याची त्याची क्षमता वाढतच जाते. परंतु अरण्यही भस्म करणारा अग्नी नियंत्रित केल्यास ज्याप्रमाणे अन्न शिजविण्यास उपयोगी पडतो, त्याप्रमाणेच वासनाही नियंत्रित करून तिला ईश्वराकडे लावल्यास तीच (वासना) परमार्थास पोषक ठरू शकते. या संदर्भात नामगीतेचे अ.१०/श्लोक १६,१७ लक्षणीय आहेत.

अग्नीस सोडता स्वैर करी भस्म अरण्यही।
संयमे योजिता त्यासी शिजवी तोच अन्नही।१६।।

तशीच वासना स्वैर नरा विषयिं रूतवी।
वळता तीच देवाशी रांधे ती परमार्थही ।।१७।।

प्रपंचात वागताना इन्द्रिये आणि विषयांचा संबंध येणारच. परंतु विषयांना भोगताना सुद्धा वासना नियंत्रित ठेवण्याचा एकच मार्ग म्हणजे ईश्वराचे स्मरण नित्य मनात ठेवणे हा होय आणि ते शक्य होण्यासाठी

नामसाधनेसारखे दूसरे साधन नाही.

पिताऽहमस्य जगतः माता धाता पितामहः।

असे भगवंताने गीतेच्या ९ व्या अध्यायात (श्लोक १७ प्र. चरण) म्हटले आहे. त्याप्रमाणे परमेश्वर माझा माता, धाता, पिता, स्वामी सर्वकाही तोच आहे या भावनेने नाम घेणे म्हणजे बालक ज्याप्रमाणे कळकळीने आईला हाक मारते व तिच्या कुशीत आसरा घेते, त्याप्रमाणे ईश्वराला हाक देऊन त्याचा आसरा घेणे होय. ते नाम कोणत्याही भौतिक लाभाच्या उपाधी विरहित व अनन्य भाव भक्तीने घेतलेले असेल तरच परमार्थमार्गावर आपल्याला पुढे घेऊन जाते.

अनन्य निर्गुणे भावे उपाधीविण भक्तिने।
देवाचा आसरा घेणे परमार्थ चि नाम ते।। ना.गी.१०/३४

ईश्वरच खरा-कर्ता मी केवळ निमित्त या भावनेने कोणत्याही कर्मफलाची अपेक्षा न ठेवता केलेली प्रपंचातील सामान्य कर्मेही परमार्थिक कर्मेच होतात. या उलट यज्ञ-दान-तपादी पुण्यकर्मेही भौतिक लाभाच्या इच्छेने केली असल्यास ती राजस कर्मे ठरतात व त्यामुळे ती परमार्थदायी होत नाहीत.

'कर्ता मी' मानुनी केले अभिमानेच कर्म जे।
फलाशा स्वार्थ बुद्धीने कर्म 'राजस' होय ते।।१०/४२

'अकर्ता मी' मानुनी केले देवा अर्पूनि सर्व जे।
फलाशा संग सोडूनी पारमार्थिक कर्म ते ।।१०/४१

अंगात ज्वर असताना, 'पौष्टिक' (Tonic) औषध लागू पडत नाही. औषधाने ज्वर काढल्यावरच 'पौष्टिक' शरीर सुदृढ करू शकते. त्याप्रमाणेच मनोविकारांचा ज्वर गेल्याशिवाय पुण्यकर्मेही परमार्थदायी ठरत नाहीत.

मनाचे ज्वर जाताची, तैसे नामचि पौष्टिक।
पडे लागू करी तेची परमार्थ सुखावह।।१०/३९

प्रपंचातील सर्व कर्मे फलाशा सोडून-पण कर्मासक्त मनुष्य फलाशा ठेवून ज्या हिरिरीने किंवा जोमाने करतो - त्याच नेटाने (परमार्थीने) करावीत. कर्म व कर्माचे कर्तृत्वसुद्धा देवावर सोडून स्वतःला केवळ निमित्त मानावे. मला काहीच समजत नाही. अशी नम्र निरभिमानी वृत्ती ही परमार्थाची पहिली पायरी आहे; तर 'माझा देव' व 'मी देवाचा'; 'आम्ही दोघे एकच आहोत' अशी अद्वैत भावना निर्माण होणे ही परमार्थाची अंतिम पायरी होय.

संसारातील कर्तव्य कर्मांकडे जराही दुर्लक्ष न करता ती सर्व कर्मे कर्मयोगाच्या युक्तीने पार पाडत असतानाच भक्तियुक्त अंतःकरणाने परमार्थ कसा साधावा (साधता येतो) हेच श्री समर्थ रामदास स्वामी वारंवार सांगत असत आणि तेच श्री गोंदवलेकर महाराजांनी नामगीतेच्या दहाव्या अध्यायात सविस्तर सांगितले आहे.

महाराज पुढे सांगतात, प्रपंचात जसा 'पैसा' तसा परमार्थात 'भाव'. परमार्थिक साधनेला अनन्य भक्तिभाव व अचल श्रद्धा यांची पार्श्वभूमी अत्यंत आवश्यक असते. बरेच वेळा अतिशय विद्वान माणसाच्या

चिकित्सक बुद्धीमुळे त्याची श्रद्धा विचलित होण्याचा संभव असतो. श्री गोंदवलेकर महाराज एकेवेळी म्हणाले होते की, 'विद्वानापेक्षा अडाणी माणसालाच परमार्थ साधक घडवणे सोपे असते'.

चविष्ट आतले पाणी खोबऱ्यास कमी चव।
विद्वत्ता वाढता तैसी निष्ठा होईच चंचल।।१०/७०

परमार्थ साधकाला सदाचाराचे पथ्य पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराज म्हणतात –

पोसण्या रोप झाडाचे लागे कुंपण ते जसे।
न खाती ते गुरेढोरे अवश्य बघणे जसे ।।१०/६४

परमार्थ वृक्षरोपाला सदाचारचि कुंपण।
ठेवण्या दूर तैसेची कामक्रोधरिपूगण।।१०/६५

पुढे महाराज थोडक्यात सांगतात की, मोक्ष गाठण्यासाठी परमार्थ मार्गावर वाटचाल करीत असताना, विकाररहित शुद्धमन, सदाचार आणि नामस्मरण या तीन गोष्टींची शिदोरी परमार्थ साधकाजवळ असणे आवश्यक असते.

देवासी भेटण्या जाण्या मोक्षमार्गीच चालता।
शिदोरी तीन गोष्टींची लागे घेण्यास साधका।१०/७८

मनशुद्ध, सदाचार नामस्मरण होय त्या।
साधका पुष्टि देती त्या मोक्षमार्गीच चालता।।१०/७९

महाराज पुढे म्हणतात की, रोगाचे निदानच चुकले असेल तर औषधे ज्याप्रमाणे व्यर्थ होतात, त्याप्रमाणे प्रथमच साधनेची दिशाच चुकली असेल तर वाट सापडत नाही. या संदर्भात परमार्थाची अचूक वाट सापडण्यासाठी साधकाने मूळात तीन चुका टाळल्या पाहिजेत. त्या चुका कोणत्या ते महाराज असे सांगतात.

निजास म्हणणे देह असे प्रथम चूक ती।
मनोविकार देहाचे पोसणे चूक दूसरी।।१०/२२

मानणे वस्तुभोगात मिळेल सुख ते खरे।
धावणे विषयामागे तिसरी चूक ती असे।।१०/८३

चुकाच करता ऐशा चुके गणित साफ ते।
जीवनाचे, मनुष्याला परमार्थ न सापडे।।१०/८४

अनन्य भाव भक्तीने परमेश्वराशी जोडले न राहता (केवळ) हट / पातञ्जल योगात पूर्ण प्रगती करून सुद्धा परमार्थ मार्गावर काहीच प्रगती होऊ शकत नाही, हे सत्य सुद्धा महाराज भक्तांच्या निदर्शनास आणून देतात.

मिळाल्या सिद्धी योग्याला हटाने जरि त्या वर।
ब्रह्मज्ञान न देती त्या होती गर्वास कारण।।१०/८६

येईच गर्व योग्याच्या मोक्षमार्गीच आड तो।
म्हणून हट योगाने साधे ना परमार्थ तो ।।१०/८७

हटयोग सिद्धीने १४०० वर्षे जगलेला 'चांगदेव' व महाभारतात वर्णन केलेला 'कौशिक ऋषि' ही या संदर्भात प्रत्यक्ष उदाहरणे आहेत. खरा मोक्षमार्ग सापडण्यासाठी चांगदेवाला ज्ञानेश्वरांकडून व कौशिक ऋषीला धर्मव्याधांकडून उपदेश घ्यावा लागला होता.

शेवटी उपसंहारात महाराज परमार्थाची व परमार्थीची थोडक्यात अशी व्याख्या करतात.

प्रपंची करता कार्ये, नामाने देव जोडता।
राहणेची समाधानें परमार्थचि तो खरा।।१०/८९

(पृष्ठ २८ वर)

गुणनिधि नाराचा एक खूप मोठा विद्वान होता. विविध नगरात जाऊन तेथील विद्वज्जन-सभेत तो सर्व विद्वानांना जाहीर आह्वान देत असे की दरबारातील विद्वानांनी कोणत्याही शास्त्रातील कोणत्याही विषयावर त्याच्याशी चर्चा करावी, वादविवाद करावा, त्याला जिंकावे, अन्यथा अजिंक्य-पत्र देऊन त्याला गौरवावे, सन्मानित करावे.अशी अनेक अजिंक्यपत्रे त्याने जमा केली होती.

भोज राजाच्या दरबारातील कविश्रेष्ठ कालिदासाची कीर्ति त्याच्या कानावर होती. कालिदासाला जिंकावे असा विचार करीत गुणनिधि धारानगरीत पोचला. धारा/अवंती

या नगरीत पोचल्यावर पत्र देऊन आपला एक सेवक राजाकडे पाठवला. ते पत्र पाहून राजला आनंद झाला. राजा भोज स्वतः विद्वान, गुणग्राही, कलांची कदर करणारा, व विद्वानांचा चाहता होता. गुणनिधीला दरबारी आणण्यकरिता पालखीची व्यवस्था केली. कर्णोपकर्णी ही वार्ता कालिदासालाही समजली. त्याने मनाशी काही निश्र्चय करून पालखीसाठी नियुक्त केलेल्या भोयांपैकी एका भोयाला बोलावून घेतले. स्वतःची योजना त्याला समजावून सांगितली. त्या भोयाच्या ऐवजी स्वतः भोई बनून कालिदास गुणनिधीला आणण्यास निघाला. गुणनिधीस पालखीतून आणीत असता थोड्या-थोड्या वेळाने भोई खांदे पालट करीत होते. त्यातील एक भोई फारच दमला आहे असे गुणनिधीला वाटले. नंतर परत जेव्हा ते थांबले तेव्हा गुणनिधीने त्यातील खूप थकलेल्या भोयाला (कालिदासाला) विचारले -

अयमान्दोलिकादण्डः स्कंधे किं तव बाधति? (म्हणजे या पालखीच्या दांड्यामुळे तुझ्या खांद्यास त्रास होत आहे काय?)

गुणनिधीने मोठ्या ऐटीत भोयाला काव्यरूपात प्रश्न विचारला. पण त्याने रचलेल्या चरणात एका शब्दाचे रूप चुकले होते. 'बाधति' हा तो शब्द! (बाध् हा धातु आत्मनेपदी आहे. त्याचे रूप बाधते असे होते. बाधति नाही.) कालिदासाला ही चूक कशी सहन होणार? कानात शिशाचा रस ओतल्यासारखे त्याला वाटले. भोई बनलेल्या कालिदासास अशा कष्टाच्या कामांची सवय नव्हती. त्याचा खांदा खरोखर दुखत होता. पण आपले ते दुःख विसरून तो गुणनिधीस म्हणाला... न तथा बाधते दण्डो यथा बाधति बाधते (तुम्ही उच्चारलेल्या बाधति या शब्दाने जितका त्रास होत आहे तितका त्रास या पालखीच्या दांड्याने होत नाही.

एका यःकश्चित भोयाने आपली व्याकरणातील चूक दाखववी हे बघून गुणनिधि लज्जित झाला. त्याने भोयास विचारले की तू कोणाकडे शिकलास?

भोई... मी तर सामान्य भोई. मी काय/

कसा शिकणार? मी कालिदासांकडे साधा सेवक आहे. तेथे विद्वानांची चर्चा नेहमी चालू असते. ती कानावर पडते इतकेच!

भोयाचे ते उत्तर ऐकून गुणनिधीला आश्र्चर्याचा धक्काच बसला. त्याने मनाशी विचार केला की ज्या कालिदासाच्या घरचे सेवकही इतके विद्वान आहेत की जे माझ्या बोलण्यातील व्याकरणाच्या चुका दाखवू शकतात तो कालिदास स्वतः किती विद्वान असेल! त्या कालिदासास मी वादविवादात कसा जिंकू शकेन? तेव्हा दरबारात न जाता येथूनच परत फिरणे चांगले, असा विचार करून पालखी थांबवून, पालखीतून घाईघाईने बाहेर पडून पलायन केले.

पूर्ण श्लोक...

अयमान्दोलिकादण्डः स्कन्धे किं तव बाधति?
न तथा बाधते दण्डो यथा बाधति बाधते ।।

पाठभेदाने.... काही ठिकाणी कथेत व श्लोकात.... ते थंडीचे दिवस होते. गुणनिधीने भोयांस असे विचारले की

रे रे सेवक मे कथय त्वं
किं शीतं तव बाधति? भोयाचे उत्तर...

न तथा बाधते शीतं
यथा बाधति बाधते ।।

**– श्रीकांत अनंत बर्वे**
१/ए/१३१, कल्पतरु हिल्स,
टिकुजीनी वाडीसमोर, मानपाडा,
ठाणे – ४०० ६१०.
भ्रमणध्वनी : ९६१९०६००१५

(पृष्ठ क्र.१३ वरून...''**अर्धनारी नटेश्वर देवाधिदेव महादेव स्वरुप वर्णन**'')

''रुद्रो नर उमा नारी तस्मै तस्यै नमो नमः।
रुद्रो ब्रह्मा उमा वाणी तस्मै तस्यै नमो नमः।
रुद्रो विष्णु उमा लक्ष्मी तस्मै तस्यै नमो नमः।

रुद्र सूर्य आहेत उमा त्यांची प्रभा, रुद्र फूल आहेत. उमा त्यांचा सुगंध, रुद्र यज्ञ आहेत, उमा त्यांची वेदी. रुद्र पुरुष आहेत. उमा त्यांची प्रकृति इ. पुनश्च लेखारंभी लिहिलेला श्लोक लिहून लेख समाप्ती करतो व हा लेख त्या देवाधिदेव महादेव शंकर भगवानांना अर्पण करतो.

''नमः शिवाभ्यां नवयौवनाभ्यां
परस्पराश्लिष्टवपुर्धराभ्याम्।
नगेन्द्रकन्या-वृषकेतनाभ्यां नमो नमः शंकर – पार्वतीभ्याम्।''

''कल्याण करणाऱ्या, नवयौवनयुक्त, परस्पर आलिंगित शरीर असलेल्यांना नमस्कार,

वृषभचिन्ह ज्याचे ध्वजावर आहे अशा शंकराला व पर्वत कन्येला वारंवार नमस्कार''

इत्यलम्.

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे – ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३
Email : vasantgod@gmail.com

•••

## विवेकानन्द शिला स्मारक, कन्याकुमारी

प्रभाकर आपटे

जानेवारीच्या अंकात, सौ. संध्या टेंबे यांचा विवेकानन्द शिला स्मारकावरील लेख अतिशय उद्बोधक आहे. त्याचा आधार त्यानी अधिकृत कथा विवेकानंद स्मारकाची हा घेतला आहे. तरीपण मी स्वतः १९६७ मध्ये मा. एकनाथजी रानड्यांना भेटलो होतो व त्यांचेकडून एक संकल्पित स्मारकाचे चित्र आणले होते. ते छापून तमिळमध्ये एक फोल्डर छापले होते. त्याची किंमत १ रु. होती. त्यातले निम्मे पैसे पत्रक व छपाई व उरलेले स्मारकाला अशी योजना होती. मी डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागात नोकरी करीत होतो आणि शिल्पाशास्त्राचे अभ्यासक डॉ. म. श्री. माटे यांच्या खोलीत बसत असे त्यांना ते पत्रक दाखवले. त्यावर त्याविषयाचे तज्ज्ञ म्हणून ते उद्गारले, 'It is hybrid Architecture.' मी ते लक्षात ठेवले व एकदा एकनाथजी पुण्यात मोतीबागेत उतरले असता त्यांना हे मत सांगितले. त्यावर ते म्हणले. 'मला त्यांच्याकडे घेऊन चल.' मी त्यांना श्री. म. माटे पथावरील बंगल्यात घेऊन गेलो. प्रवेश करताच त्यांनी माट्यांना सांगितले, 'It is hybrid Architecture.' नंतर ते का व कसे ते २ तास वर्णन करून सांगितले. तेव्हा माट्यांचे समाधान झाले. पुढे एकनाथजींच्या निधनानंतर आम्ही दोघांनी त्यांच्यावर लेख लिहिले दै. तरुण भारतात ते मला आठवते.

मी १९६० साली मा. बाबाराव भिडे यांचे पत्र घेऊन P.B.D. साठी माहिती गोळा करायचो. मद्रास विद्यापीठात व अड्यारला ग्रंथालयात जाण्यासाठी संघकार्यालयात राहण्याची सोय करण्यासाठी गेलो. तेव्हा 12 Pilliar Koil St. या ठिकाणच्या कार्यालयात उतरलो व तिथल्या प्रचारकाना R. Gopalan यांना काम सांगितले. मला संस्कृत विभाग प्रमुख डॉ. राघवन्ना भेटायचे होते. त्यांनी अर्ध्या तासांनी मला मोटर सायकलवरून १४ कृष्णापुरम् स्ट्रीट इथे डॉ. राघवन्च्या घरी नेले. कारण त्यांना त्यांनी विजयादशमीच्या उत्सवाला पाहुणे म्हणून बोलावले होते. तिथेच पहिली भेट झाली त्यांची. त्यांनी खंडेनवमी म्हणजे सरस्वती पूजना दिवशी म्हणजे आपल्याकडे शस्त्रपूजन असते तेव्हा त्यांनी हातात आरतीचे तबक घेऊन पुस्तके, टाईपरायटर इ. सर्व वस्तूंना आरती ओवाळली. मग आम्ही त्यांच्या गाडीतून अड्यार लायब्ररीत गेलो. तिथे नारळाच्या फांद्यांची पाने विणून प्रवेशद्वारावर कमान उभारली होती. तिथली ग्रंथपूजा झाल्यावर आम्ही त्यांचे सहकारी K. Kurjuni Raja याच्या बंगल्यावर कॉफी प्यायला गेलो. त्यांनी पत्नीची ओळख करून दिली. मग डॉ. राघवन्नी राजा हे श्रावणकोरचे राजघराण्यातील नाव आहे असे सांगितले व त्यांच्या घराण्यात मातृसत्ताक पद्धती कशी चालते ते सांगितले. दुसऱ्या दिवशी त्यानी संस्कृत विभागात नेले व त्यांच्या कार्यालयात एका कपाटाचे कप्पे उघडून

हस्तलिखितांचा मोठा कॅटलॉग प्रकल्प कार्डे बनवून ते करत होते तो दाखवला व पांचरात्रावरील हस्तलिखिते मला शोधायला सांगितले. त्यानंतर त्यानी मला त्रिचनापल्लीजवळील श्रीरंगम् या रंगनाथाच्या महादेवालयात भेट द्यायला सांगितले व तिथून मैसूरमधील आसुदि श्रीनिवास अय्यंगाराच्याकडे पांचरात्र ग्रंथासाठी पाठवले. तिथे त्यांच्याकडील हस्तलिखिते व पुस्तके पाहिली. त्यानंतर त्यांनी ते दिवाळी नंतर पुण्याच्या रास्तापेठेत एका गॅरिसन इंजिनिअरकडे राहणार असे सांगितले. पुढे ते माझे आगमगुरुच झाले. तर १२ पिलिअर कोविल स्ट्रीट मधून रोज मी अड्यार लायब्ररीत जात असे. पुढे १९६७ साली त्याच ठिकाणी एकनाथजी उतरले होते. तिथे इडली सांबार नाष्ट्याबरोबर त्यांच्याशी गप्पा मारताना जी माहिती कळली ती अशी – कन्याकुमारीच्या तिनेवेल्ली जिल्हयाच्या विवेकानंद शताब्दी कार्यकर्त्यांनी मोठ्या हिंमतीने दोनापैकी मोठ्या खडकावर जिथे त्यांना भारतमातेचे दर्शन घडले आणि रामकृष्ण परमहंसांनी अमेरिकेत जाण्याचा उपदेश केला, तिथे एक शिळा बसवली. पण ती केरळच्या ख्रिश्चन मच्छीमारांनी तीनदा उखडली. ती तक्रार त्यांनी प. पू. गोळवळकर गुरुजींना सांगितली. त्यातले गांभीर्य ओळखून त्यांच्याबरोबर असणाऱ्या सर कार्यवाहांना त्यांचा प्रश्न सोडवून मग नागपूरला यायची सूचना केली. तेव्हा त्यांनी १२ पिलिअर कोविल स्टेशन मध्ये ठाण मांडले व तत्कालीन काँग्रेस मुख्यमंत्री व कांची कामकोटीचे परमाचार्य चंद्रशेखरेन्द्र सरस्वती यांचे भक्त भक्तवत्सलम् यांच्याकडे त्या शिलेला संरक्षण देण्याचा आग्रह धरला. एक दिवस ते चिडले व त्यांना म्हणाले. 'तुम्ही खुल्या समुद्रातल्या खडकावर शिळा बसवणार. त्यांचे संरक्षण सरकार कसे करणार? Why don't you enclose it? ती शिळा तुम्ही बंदिस्त का करीत नाही? त्या दिवशी त्याना रात्रभर झोप आली नाही. मग त्यांच्या ध्यानात आले की बंदिस्त करणे म्हणजे छोटे मंदिर बांधणे. त्यासाठी ते कांची कामकोटीच्या परमाचार्यांकडे गेले. त्यांनी म्हटले 'संन्यासाचे काय मंदिर होते कां?' त्यानंतर ते थेट बेळूरला गेले. तिथे रामकृष्णांचे भव्य स्मारक आहे. त्यांची कल्पना १९०८ सालची विवेकानंदांची. भारतातल्या वेगवेगळ्या शिळा व शैली एकत्र करून भारतीय संस्कृतीचे एकत्र दर्शन ही कल्पना. तीच मा. एकनाथजींनी उचलली. ते कांचीच्या शंकराचार्यांकडे गेले. त्याना त्यानी असे पटवले की ते विवेकानंदांच्या समाधीचे मंदिर नव्हे तर जिथे विवेकानंदांना समाधी लागली त्यांचे मंदिर करायचे, ते त्यांना पटले आणि त्यांनी भक्तवत्सलम्ना पटवले. जर ते चिडले नसते तर हे एवढे स्थापत्यायन घडलेच नसते. त्यासाठी त्यांनी मानचित्रावर महाबली पुरम्चे हस्तिपृष्ठाकार मंदिर, आंध्रची जिथे राजधानी बनणार त्या अमरावतीच्या पुरातत्वीय खिडक्या सांचीच्या स्तूपाचा दर्शनी भाग अशी hybrid Architecture ची योजना केली. म्हणून ते माट्यांना म्हणाले 'हो ते hybrid शिल्प आहेच'. तर मी आमच्या आईला घेऊन ते पहायला १९७० साली गेलो होतो. त्यावेळी ते स्मारक फक्त १ महिन्याचे होते.

तळघरात ध्यानमंदिर आहे. त्या पायऱ्या उतरून फरशीवर पाऊल टाकतांना आमच्या आईने नऊवारी साडी वर घेतली कारण त्या फारशीवर पाण्यात दिसावे तसे प्रतिबिंब दिसत होते. तर पद्मभूषण गणपती स्थपतींचे थोरले मेहुणे S. K. Achari यांनी ते स्मारक घडवले. पिढ्यान पिढ्याचे कौशल्य त्यांच्या कारागिरांत उतरले होते. आता त्या दोन खडकावरील मोठ्या खडकावर विवेकानंद स्मारकाच्या रुपाने horizontal wonder आणि V. गणपतींनी छोट्या खडकावर उभारलेला १३०+४०=१७३ फुलांचा मेद बहुवावरचा पुतळा हे Vertical wonder दोन्ही दिमाखात उभे आहेत. आणि त्सुनामी वादळाला टक्कर देऊन शाबूत राहिली आहेत. विश्वकर्मा आणि स्थपतींचा पूर्वज मय यांना त्यांच्या Sustainable technology आणि Aesthetics साली शतशः प्रणाम.

**डॉ. प्रभाकर आपटे**
सी-५-४०१, बुद्धदेवविहार,
हिल गार्डन,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०१.
मो. ७०२१७७६५१५

●●●



(पृष्ठ क्र. २३ वरून ......**परमार्थ**)

अनन्य भक्तिभावाने श्रद्धेने राहि जोडला।
देवाशी नित्य नामाने परमार्थीच तो खरा।।१०/८८

ईशाची करता कार्ये ईशा नित्य स्मरेच जो।
निजा अकर्ता मानी जो, परमार्थी खराच तो ।।१०/९१

आणि शेवटी -

देवाचिये द्वारी। उभा क्षणभरी।
त्याने मुक्ति चारी। मेळविल्या।।

असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. त्यातील 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी' म्हणजे नेमके काय? यात कोणता गर्भितार्थ दडलेला आहे? याचा खुलासा महाराज नामगीतेच्या १० व्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात असा करतात.

नामस्मरणी देवाच्या विसरे क्षणही निजा।
होई तो क्षण मुक्तीचा परमार्थचि साधता।।
१०/९२

(टीप : या लेखात उद्धृत केलेले श्लोक याच लेखकाच्या श्री गोंदवलेकर महाराज प्रणीत, श्री. प्रभारक विरचित, 'श्री गोंदवलेकर नामगीता' या पुस्तकातील आहेत. हे पुस्तक हवे असल्यास वाचकांनी लेखकाशी संपर्क साधावा. - संपादक)

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

चरित्रातील आख्यायिकावरून अद्वैतवेदान्ताचा व्यापक अर्थ त्यांच्या अंगी प्रत्यक्ष बाणलेला होता, हे दिसून येते. एकनाथ, विठा रेणुकानंदन, जनी जनार्दन, रामा जनार्दन आणि दासोपंत ह्या पाच समकालीन सत्पुरुषांना नाथपंचक म्हटले जाते. यांपैकी दासोपंतांची बरीच आणि जनी जनार्दनांची काही मराठी रचना उपलब्ध आहेत. चतुःश्र्लोकी भागवत (सु. १५५५) ही नाथांची पहिली रचना. भागवत पुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ श्लोकांवरील १,०३६ ओव्यांचे हे भाष्य आहे. सृष्टीच्या आद्यंती असलेल्या नारायणाचे व भागवत धर्माचे निरूपण त्यात आढळते. प्राकृत भाष्यग्रंथांना पंडितवर्गाकडून होणाऱ्या विरोधाचे पडसाद येथे उमटले आहेत.

वरील भाष्यानंतर एकनाथांनी काही आध्यात्मिक स्वरूपाची स्फुट प्रकरणे लिहिली. शंकराचार्यांच्या हस्तामलक या चौदा श्लोकांच्या स्तोत्रावर ६७४ ओव्यांची रसाळ टीका त्याच नावाने त्यांनी लिहिली. शुकाष्टक हे प्रसिद्ध संस्कृत अष्टकावरील ४४७ ओव्यांचे विवरण आहे. स्वात्मसुखात ५१० ओव्या असून गुरुस्तवन, अद्वैतभक्ती व भक्तिमार्गातील परमार्थ हे विषय त्यात आले आहेत. आनंदलहरीतील १५ ओव्यांत आत्मस्थितीतील आनंदाचे व गुरुभक्तांचे वर्णन आहे. चिरंजीवपदात साधकाला उपदेश केलेला आहे.

रुक्मिणी स्वयंवर (१५७१) हे भागवत संप्रदायातील पहिले व परंपराप्रवर्तक आख्यानक काव्य होय. भागवताच्या दशम स्कंधातील अध्याय ५२ ते ५४ मधील १४४ श्लोकांच्या व हरिवंशातील विष्णुपर्वाच्या अध्याय ५९-६० च्या आधारे एकनाथांनी त्याची रचना केली. त्याची ओवीसंख्या १,७१२ आहे. श्रीकृष्ण-रुक्मिणीचा विवाह म्हणजे जिवाशिवांचे मीलन, अशा रूपकाभोवती हे संपूर्ण काव्य रचलेले आहे. या काव्याचा प्रभाव पुढील अनेक कवींवर पडलेला दिसतो. कृष्णदयार्णव ह्या कवीने तर आपल्या हरिवरदा या रचनेत प्रस्तुत काव्य संपूर्णपणे अंतर्भूत केले. एकनाथी भागवत ही एकनाथांची सर्वश्रेष्ठ रचना होय. भागवत पुराणाच्या एकादश स्कंधावरील ही विस्तृत टीका आहे.

भावार्थ रामायण ही त्यांची अखेरची रचना. वाल्मीकी रामायण, अध्यात्म रामायण, क्रौंच रामायण, आनंद रामायण, योगवासिष्ठ इ. ग्रंथांच्या आधारे ही रचना केलेली आहे. 'बाल', 'अयोध्या', 'अरण्य', 'किष्किंधा', 'सुंदर' ही पहिली पाच कांडे आणि सहाव्या युद्ध कांडाचे ४४ अध्याय लिहून झाल्यानंतर नाथांनी देह ठेविला. त्यापुढील भाग गावबा नावाच्या त्यांच्या शिष्याने पूर्ण केला, असे परंपरा सांगते. याशिवाय मुक्तेश्वर, कोनेरीसुतशेष व एक अनाम कवी यांनी 'एका-जनार्दन' या नावानेच 'उत्तर'कांड लिहून भावार्थ रामायणाच्या पूर्तीचे प्रयत्न केले आहेत. भावार्थ रामायणाचे स्वरूप रामचरित्रावरील स्वतंत्र पौराणिक महाकाव्यासारखे आहे. एकनाथांच्या आवडत्या आध्यात्मिक रूपकांबरोबरच या काव्यात सामाजिक रूपकात्मताही आढळते. तत्कालीन यावनी सत्तेचा मराठी समाजावर

झालेला अंतर्बाह्य अनिष्ट परिणाम त्यातून सूचित केला आहे.

या रचनांखेरीज बहुजनसमाजासाठी एकनाथांनी केलेली कथात्मक रचनाही वेधक आहे. सुबोध शैलीने लिहिलेल्या तुळशीमाहात्म्य व सीतामंदोदरीची एकात्मता या पुराणकथा, सांसारिकांच्या मनोवृत्तीचा आल्हादक व विनोदरम्य आविष्कार करणाऱ्या हळदुली व कृष्णदान ह्या श्रीकृष्णकथा, कृपण माणसाचे हास्यजनक स्वभावचित्र रेखाटणारे कदर्यु-आख्यान, ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यू आणि सुदामा यांच्या नाट्यपूर्ण लघुचरित्रकथा आणि ज्ञानेश्वरादी संतांच्या संक्षिप्त जीवनकथा ही अशा रचनेची उदाहरणे होत.

एकनाथांनी गेय पद रचनाही केली आहे. ही पदे मुख्यतः श्रीकृष्ण-चरित्रपर आहेत. त्यांत सुंदर शब्दचित्रे, भावपूर्णता, कल्पकता, ध्रुव-पदांची वेधकता, मार्मिक तत्त्वसूचकता इ. वैशिष्ट्ये आढळतात. 'वारियाने कुंडल हाले', 'असा कसा देवाचा देव बाई ठकडा' इ. त्यांची पदे प्रसिद्ध आहेत.

प्राचीन मराठीतील भारूडरचनेत नवचैतन्य, विविधता व विपुलता निर्माण करण्याचे कार्य एकनाथांनीच केले. १२५ विषयांवर सु. तीनशे भारुडे त्यांनी रचली. पुरातन काळापासून मराठी बहुजन-वर्गाचे आपल्या मनोरंजक व नाट्यपूर्ण गीतरचनेने रंजन करणाऱ्या गोंधळी, भराडी, वासुदेव, डोंबारी, बाळसंतोष वगैरे जमातींचा एक वर्ग होता. एकनाथांनी त्यांच्या अलिखित लोककाव्याचे पुनरुज्जीवन केले. त्यांच्या कवित्वाची व्यापकता व लौकिकता यावरून स्पष्ट होते. आदिमाया, विंचू, जागल्या, कुडबुड्या जोशी या विषयांवरील त्यांची भारुडे प्रसिद्ध आहेत.

एकनाथांची बरीचशी रचना साडेचार चरणी ओवी छंदात आहे. त्यांनी स्फुट अभंगरचनाही केली आहे. गुरुभक्ती, पारमार्थिक अनुभव व सामाजिक स्थिती हे त्यांच्या अभंगांचे मुख्य विषय आहेत. त्यांत नामदेव-तुकारामांसारखा साधकदशेतील भावोत्कट अंतःकलह आढळत नाही. रचनादृष्टीनेही एकनाथी अभंग सैल आहेत.

एकनाथांचे वाङ्मयीन, सांप्रदायिक व सांस्कृतिक कर्तृत्व त्यांच्या समन्वयवादी व्यक्तिमत्त्वाचेच निदर्शक आहे. प्रपंच व परमार्थ तसेच संतत्व आणि समाजोद्धार यांची यशस्वी सांगड आपल्या जीवनात त्यांनी घातली. जन्मजात स्वभावाबरोबरच तत्कालीन परिस्थितीनेही एकनाथांचे व्यक्तिमत्त्व घडविले.

अडीच शतकांच्या ज्ञानेश्वरोत्तर कालखंडात संतसाहित्याची परंपरा खंडित व विस्कळित झाली होती. एकनाथांनी त्या पूर्वपरंपरेचे भान ठेवून वाङ्मयनिर्मिती केली म्हणूनच ती परंपरा अखंड, एकात्म व प्रगमनशील राखण्याचे कार्य ते यशस्वीपणे करू शकले. ज्ञानेश्वरीच्याच परंपरेतील पण अधिक सुबोध भाष्यग्रंथ म्हणजे त्यांचं भागवत होय. भागवतामुळे वामनपंडित, शिवकल्याण, रमावल्लभदास यांसारख्या कवींना भाष्यरचनेची स्थिर बैठक लाभली. त्यांच्या भावार्थ रामायणामुळे मुक्तेश्वरासारख्या कवीला रामायण व महाभारत यांच्या रूपांतराची दिशा

लाभली. रुक्मिणी स्वयंवराने तर आख्यानक काव्याचा नवा प्रवाहच मराठीत रूढ केला. बहुजनसमाजाला रूपके समजतात व आवडतात, म्हणून एकनाथांच्या रूपकप्रचुर शैलीचा अवतार झाला. मराठीचा पुरस्कार करतानाही, सर्वसंग्राहक भाषादृष्टीने त्यांनी संस्कृत भाषेचे प्रौढत्व तिला प्राप्त करून दिले आणि आपल्या भारूडरचनेत बोलीभाषेचाही स्वीकार केला. वीररसाचा आविष्कार, अभंगरचनेतील भेदक समाजचित्रण, कीर्तनोपयोगी नाट्यपूर्ण कथाकाव्य यांही बाबतींत संतसाहित्यातील पहिले कर्तृत्व एकनाथांचेच आहे. संतत्वात अभिप्रेत असलेल्या लोकसंग्रहाचे, लोकसेवेचे व लोकाद्धाराचे साधन म्हणूनच एकनाथांनी कवित्वाची साधना केली म्हणूनच त्यांच्या काव्यरचनेत आशयाभिव्यक्तीचे वैचित्र्य व वैपुल्य निर्माण झाले.

तेराव्या शतकात ज्ञानेश्वर–नामदेवांनी बहुजनसुलभ भक्तिमार्गाची प्रतिष्ठापना केली. पुढील अडीच शतकांत यावनी सत्तेमुळे भक्तिमार्गाचा प्रभाव क्षीण झाला. एकनाथांनी त्या भागवत पंथाचे प्रभावी पुनरुज्जीवन केले. आपल्या भागवत टीकेने भक्तिपंथाची त्यांनी शास्त्रोक्त प्रतिष्ठापना केली आणि बहुजनवर्गाचा मेळावा त्या पंथाभोवती संघटित केला. भागवत पंथाला अशा प्रकारे शास्त्र आणि समाज यांचे दुहेरी अधिष्ठान त्यांनी प्राप्त करून दिले. जनताजनार्दन हे एक नवे तत्त्व प्रतिपादून भागवत पंथाला त्यांनी अधिक लोकाभिमुख बनविले. या पंथाला श्रीकृष्णाप्रमाणेच श्रीराम हे दैवत नव्याने परिचित करून दिले व रामचरित्राचा वीरवृत्तिपोषक व कालोचित भावार्थही कथन केला. एकनाथांचा भागवतधर्म व रामराज्याची कल्पना म्हणजे मध्ययुगीन महाराष्ट्रातील प्रेरक विचारधन होय. मराठी भाषा, वाङ्मय, विचार आणि वर्तन या सर्व क्षेत्रांत त्यांनी समाजप्रबोधन व समाजसंघटन केले. त्यातूनच सतराव्या शतकातील स्वराज्याच्या चळवळीला अनुकूल पार्श्वभूमी तयार झाली, असे म्हणता येईल.

नाथांच्या जीवनातील आणखी एका महत्त्वाच्या कार्याचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ज्या ज्ञानेश्वरप्रणीत विचारांशी नाथ सर्वतोपरी एकरुप झालेले होते, त्या ज्ञानेश्वरांच्या आळंदी येथील समाधिस्थानाची वाताहत झालेली होती. तेथपर्यंत जाण्याची सरळ वाट सापडणेही अवघड झाले होते. नाथांना याची तीव्रतेने जाणीव झाली. त्यांना स्वप्नात दृष्टान्त झाल्याची, स्वतः ज्ञानदेवांनी, आपल्या गळ्याला अजान वृक्षाच्या मुळ्यांचा फास लागल्याचे सांगितल्याची कथा सर्वश्रुत आहे. ती नाथांना जाणवणाऱ्या ज्ञानेश्वरांविषयीच्या उत्कट श्रद्धेची व समाधीच्या दुरवस्थेविषयी जाणवणाऱ्या वेदनेची द्योतकच मानली पाहिजे. नाथांनी स्वतः प्रयासाने समाधिस्थानापर्यंत जाऊन, त्याचा जीर्णोद्धार करविला. त्याबरोबरच आणखी एक मोलाचे कार्य अंगावर घेतले व तडीस नेले, ते म्हणजे 'ज्ञानेश्वरी'ची शुद्ध प्रत तयार करण्याचे. मध्यंतरीच्या काळात ज्ञानेश्वरीच्या ज्या विविध प्रती नकलल्या गेल्या त्यांत अनेक अपपाठ शिरले होते. प्रत्येक प्रत मूळ प्रतीवरुनच तयार होत नसणार. एका प्रतीवरुन दुसरी असा प्रकार

होत असणार. त्यात पहिल्या प्रतकाराने केलेल्या चुका केवळ पुनरावृत्तच होत असत असे नव्हे, तर नव्या प्रतीत नवीन चुकांचीही भर पडत गेली. अक्षर न लागणे, अज्ञानामुळे मूळ शब्द न कळल्याने आपल्या कल्पनेने बदलणे; तर काही आगाऊ प्रतकारांनी आपल्या स्वतःच्या ओव्यांची सरमिसळ करणे; अशा कारणांनी मूळ लेखनाचे प्रतीनुसार रूपच पालटून जात असे. एकनाथांनी अत्यंत प्रयासाने विविध प्रतींचा तुलनात्मक विचार करून आपल्या दृष्टीने ज्ञानेश्वरीचा मूळ पाठ निश्चित केला. ही ज्ञानेश्वरीची तंतोतंत मूळ प्रत नसली तरी, नाथांना ज्ञानेश्वरांच्या तात्त्विक भूमिकेची जाण असल्याने अधिकात अधिक शुद्ध प्रत असे तिचे स्वरुप निश्चितच म्हणावे लागेल. या शुद्ध प्रतीच्या शेवटी नाथांनी 'इथे ग्रंथाचिये पाठी। जो ओवी करील नेटकी।। तेणे रत्नाचिये ताटी। जाण नरोटी ठेविली।। असा जळजळीत इशारा देऊन ठेवला आहे. त्यांतील ज्ञानेश्वरीबद्दलचा आदर आणि अपपाठ घुसडणाऱ्यांविषयीची चीड कुणालाही जाणवल्याविना राहत नाही.

मुघलांनी अतोनात अत्याचार अवलंबिले होते. मंदिरे तोडली जात होती. हिंदु संस्कृतीचा सर्वत्रे निःपात मांडला होता. अशा काळात आपल्या संस्कृतीची उर्जस्वल महती वर्णन करून इथल्या बहुजन समाजाला धर्मप्रवण करण्याचं काम संत एकनाथांनी केले. भारतीय तत्त्वज्ञान प्राकृत भाषेत वापरुन अवघ्या जनांशी शहाणं करण्याचा विवेकी प्रयत्न एकनाथांनी केला. आज त्यांची ४८७ वी पुण्यतिथी. त्यांना कृतज्ञ वंदन.

**संदर्भ :**

१) मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती, मुंबई
२) एकनाथ वाङ्मय दर्शन, भगवंत देशमुख, साहित्य अकादमी, दिल्ली.

**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : ए/५०३, सन्निधीपार्क सोसायटी, हरीओम नगर, मुलुंड (पू.)–४०००८१**
**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**
**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**
**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**
**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**
**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**
**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही – अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, ए/५०३, सन्निधीपार्क सोसायटी, हरीओम नगर, मुलुंड (पू.)–४०००८१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१